अंतरंग

पनवेल पोलीस ठाण्यात महिला दक्षता समितीची बैठक/३

मांगूर माशाच्या हद्दपारीसाठी मत्स्य विभाग सक्रिय/५

टेबल टेनिसमध्ये मनीष, पृथ्वेश, वैदेही चमकले/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३४७

www.ramprahar.com

बुधवार, ५ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



।। विद्या विनयेन शोभते ।।
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Dr. C. D. Deshmukh Centre for Administrative Services
७५,००० पदांची भरती
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
तलाठी मार्गदर्शन शिबीर
आणि
ग्रामसेवक
कृषिसेवक
आरोग्यसेवक
पोलीस भरती
जिल्हापरिषदेमधील
व इतर सरळसेवा
CONTACT: 9833177551/9223555779 | WEBSITE: www.ckthakurcollege.net


## राज्यातील नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती

# हरित हायड्रोजन धोरण जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीकरणीय ऊर्जा आणि हरित हायड्रोजनच्या प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या हरित हायड्रोजन धोरणास मंगळवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. असे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आठ हजार ५६२ कोटी रुपये खर्चासदेखील या वेळी मान्यता देण्यात आली.



पंतप्रधानांनी राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन जाहीर केले असून २०२३पर्यंत देशात पाच मिलियन टन हरित हायड्रोजन दरवर्षी निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यातदेखील हरित हायड्रोजन आणि संबंधित उत्पादनांची क्षमता ओळखून हे धोरण तयार करण्यात आले आहे. राज्याची सध्याची हायड्रोजनची मागणी दरवर्षी ०.५२ मिलियन टन इतकी आहे. ही मागणी २०३०पर्यंत १.५ मिलियन टनांपर्यंत पोहचू शकते.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर करण्यात आलेल्या हायड्रोजन धोरणामध्ये ओपन ॲक्सेसद्वारे स्वयंवापरासाठी राज्यातून किंवा राज्याबाहेरून, राज्यातील वीज वितरण कंपन्यांकडून पॉवर एक्स्जेंजकडून नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करणाऱ्या प्रकल्पांना लाभ सवलती दिल्या जातील. महाऊर्जा कार्यालयाकडे हरित हायड्रोजन आणि संबंधित उत्पादन प्रकल्पांची नोंदणी करण्यात येईल. या प्रकल्पांना २५ हजार प्रति मेगावॅट इलेक्ट्रोलायझर क्षमतेनुसार प्रकल्प सुविधा महाऊर्जाकडे जमा करावी लागेल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून पुढील दहा वर्षांसाठी पारेषण शुल्क, व्हिलिंग चार्जेसमधून अनुक्रमे ५० टक्के व ६० टक्के सवलत देण्यात येईल. स्टँडअलोन व हायब्रीड ऊर्जा प्रकल्पांना अनुक्रमे पुढील १० वर्षांसाठी आणि १५ वर्षांसाठी विद्युत शुल्कातून १०० टक्के सवलत देण्यात येईल तसेच क्रॉस सबसिडी व अधिभारातूनदेखील माफी देण्यात येईल.

याशिवाय पॅकेज स्कीम ऑफ इन्सेंटीव्हज् २०१९नुसार लाभ मिळतील. पाच वर्षांकरिता हरित हायड्रोजनच्या गॅसमध्ये मिश्रणासाठी प्रत्येक किलोकरिता ५० रुपये अनुदान देण्यात येईल तसेच पहिल्या २० हरित हायड्रोजन रिफ्युएलिंग स्टेशनला कमाल ४.५० कोटी रुपये या मर्यादेत ३० टक्के भांडवली खर्च अनुदान देण्यात येणार आहे. पहिल्या ५०० हरित हायड्रोजन आधारित फ्युएल सेल प्रवासी वाहनांना कमाल ६० लाख रुपये प्रति वाहन एवढ्या मर्यादेत ३० टक्के भांडवली खर्च अनुदान दिले जाणार आहे.

हरित हायड्रोजन प्रकल्पांसाठी असलेल्या जमिनीला स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर, अकृषिक कर व मुद्रांक शुल्कातून पूर्ण सवलत देण्यात येईल. हरित हायड्रोजन कक्षासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ घेणे, त्यांचे प्रशिक्षण, कौशल्य विकास, एक खिडकी सुविधा इत्यांदी बाबींकरिता वार्षिक चार कोटी या प्रमाणे १० वर्षांसाठी ४० कोटी रुपये खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.


*मंत्रिमंडळ बैठकीत विविध विषयांना मंजुरी/२*




**मुंबई : राज्य शासनाला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने वर्षभरातील महत्त्वाच्या निर्णयांचा आढावा घेणारी निर्णय पुस्तिका 'पहिले वर्ष सुराज्याचे' आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'लोकराज्य' या मासिकाचे प्रकाशन मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते.**

# विकासाच्या मुद्द्यावर सरकारमध्ये सहभागी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भूमिका



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाल्यानंतर अजित पवार यांनी मंगळवारी (दि. ४) पहिल्यांदाच कॅबिनेट मिटिंगमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देत आपण या सरकारमध्ये विकासाच्या मुद्द्यासाठीच आलो आहे, असे सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कॅबिनेट काही आम्हाला नवी नाही. एकनाथ शिंदे आणि मी अडीच वर्षे सत्तेत होतोच. शिवाय भाजपमध्ये असे काही मंत्री आहेत उदाहरणार्थ राधाकृष्ण विखे-पाटील त्यांच्यासह आम्ही काम केले आहे. त्यामुळे पहिल्या कॅबिनेटबाबत आम्हाला काही विशेष वाटले नाही. राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर आम्ही चर्चा केली.

आम्ही आता एकत्र काम करायचे ठरवले आहे. त्यामुळे कुठलीही नाराजी नाही. कुणालाही कसली अडचण नाही. या संदर्भात जेव्हा एका पक्षात विस्तार होतो किंवा पदांचे वाटप होते तेव्हा मतमतांतरे असू शकतात, मात्र सगळ्यांचे म्हणणे ऐकल्यावर अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील. ते तो निर्णय योग्य पद्धतीने घेतील असा मला विश्वास आहे, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी म्हटले.

**पंतप्रधान मोदींशिवाय देशाला पर्याय नाही!**

मी विकासाच्या मुद्द्यासाठी या सरकारच्या बरोबर आलो आहे. देशपातळीवर विचार केला, तर आज पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय देशाला पर्याय नाही. सगळे विरोधक विस्कळीत आहेत. देश पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात आगेकूच करीत आहे. त्यामुळे आम्ही सगळ्यांनी त्यांना पाठिंबा दिला पाहिजे या भावनेतून सरकारमध्ये आलो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी स्पष्ट केले.

## निवडक

### राष्ट्रपतींच्या उपस्थितीत राज्यात विविध कार्यक्रम

**नागपूर** : विदर्भ दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. ५) गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ तसेच कोराडीतील सांस्कृतिक केंद्राचे उद्‌घाटन होणार आहे, तर राष्ट्रपती ६ जुलै रोजी राजभवनावर आदिवासी समाजबांधवांशी संवाद साधून मुंबईकडे रवाना होतील.

### अभिनेता शाहरूख खानला शूटिंगदरम्यान गंभीर दुखापत

**लॉस एंजेलिस** : बॉलीवूड अभिनेता शाहरूख खानला 'जवान' चित्रपटाच्या शुटिंगदरम्यान लॉस एंजेलिसमध्ये नाकाला दुखापत झाली आहे. रक्तस्त्रावामुळे त्याच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर शाहरूख भारतात परतला आहे.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : ६१.२ मिमी**
**एकूण पाऊस : ७०८.४ मिमी**

## गाड्यांना धडक देत कंटेनर घुसला हॉटेलमध्ये

# धुळ्यातील अपघातामध्ये १२ जण ठार, अनेक जखमी

**धुळे : प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्गावरील धुळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील पळासनेरजवळ मंगळवारी (दि. ४) सकाळी एक भरधाव कंटेनर नियंत्रणाबाहेर जाऊन वाहनांना उडवत थेट रस्त्याच्या बाजूला असलेल्या हॉटेलमध्ये शिरला. या भीषण अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला असून १५ ते २० जण जखमी झाले आहेत.



महामार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. हा कंटेनर महामार्गालगत असलेल्या हॉटेलमध्ये शिरून उलटला. तत्पूर्वी कंटेनरने नऊ गाड्यांना धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, स्थानिक यंत्रणेने घटनास्थळाकडे धाव घेत तातडीने बचावकार्य सुरू केले. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या भीषण अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज तसेच अपघातानंतरचे व्हिडीओ, फोटोदेखील समोर आले आहे. या व्हिडीओत महामार्गावर एक भरधाव ट्रक वाहनांना उडवून पुन्हा हॉटेलमध्ये शिरल्याचे दिसून येते. या अपघाताच्या वेळी उडालेले धुळीचे लोटदेखील व्हिडीओमध्ये दिसून येत आहेत.

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवा

## ■ आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**मुरूड : प्रतिनिधी**

ज्ञानदानाचे महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदाचे कोणतेही प्रश्न प्रलंबित राहता कामा नयेत. आलेल्या पत्राला त्वरित उत्तर प्रत्येक विभागाकडून दिले गेले पाहिजे. प्रश्न सोडवाल तेव्हाच शिक्षण कार्यालयातील गर्दी कमी होणार आहे. लोक खूप दुरून येत असतात. याचे भान अधिकारीवर्गाने ठेवावे आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न यापुढे तातडीने सोडवण्यासाठी शीघ्र पद्धतीने काम करावे, असे निर्देश कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दिले आहेत. ते अलिबाग येथे बैठकीत बोलत होते.



अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयातील टिपणीस हॉलमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत विशेष बैठक सोमवारी (दि. ३) आयोजित करण्यात आली होती. या वेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करून शिक्षक व विद्यार्थ्यांचे हित हे अंतिम या तत्त्वास लक्षात घेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खासगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेतून करण्याबाबत सूचना आमदार म्हात्रे यांनी केली. अनुकंपा, नियुक्ती, अनुदान, ६ फेब्रुवारी २०१२नुसार एनओसीची अट रद्द करणे, वैद्यकीय प्रलंबित बिले, खोपोलीतील शाळांचे प्रश्न, सेवाज्येष्ठता यादी, वरिष्ठ वेतन श्रेणी, निवड श्रेणी, प्राथमिक केंद्रप्रमुख यांच्या वरिष्ठ वेतन श्रेणीबाबत प्रस्ताव, सेवानिवृत्त शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करणे, अल्पसंख्याक शाळांचे प्रश्न इत्यादी मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून शिक्षणाधिकाऱ्यांना आदेशित करण्यात आले.

या बैठकीस प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, माध्यमिक शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे व अधिकारी तसेच संघटनेचे रवींद्रनाथ पाटील, रोशन तांडेल, राजेंद्र पवार, फरिदुल काजी, हितेंद्र म्हात्रे, नामदेव फापाळे, दीपक मोकल, बबन पाटील, सुरेश मोकल, दिलीप म्हसे, संजय गायकवाड, अविनाश कदम, विशाल पाटील, अनंत पाटील, बडेकर यांच्यासह शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात जूनमध्ये सरासरी ७० टक्के पाऊस

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील पाच दिवस रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. जून महिन्यात सरासरीच्या ७० टक्के पाऊस पडला. जिल्ह्यात मंगळवारी (दि. ४) सकाळी संपलेल्या २४ तासांत ६१.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

रायगड जिल्ह्यात जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाला सुरुवात झाली. जून महिन्यात सरासरी ६५५.८ मिमी पाऊस पडतो, पण यंदा ४५९.१ मिमी पाऊस पडला. म्हणजेच जून महिन्यात सरासरीच्या ७० टक्के पाऊस पडला, तर जुलै महिन्यात आतापर्यंतच्या पहिल्या चार दिवसांत १५५.५ मिमी पाऊस अपेक्षित होता. त्यात वाढ होऊन तो १८८ मिमी पडला.

जिल्ह्यात जुलै महिन्याच्या पहिल्या चार दिवसांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला असला तरी एकूण पर्जन्यमानाच्या केवळ २२.५ टक्के इतकाच पाऊस झाला आहे. गेल्या वर्षी ४ जुलैपर्यंत ६०.५ टक्के पाऊस पडला होता. जिल्ह्याचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ३१४८.६ मिलीमीटर आहे. जुलै महिन्याच्या ४ तारखेपर्यंत ७०८.४ मिलीमीटर पाऊस पडला आहे.

पावसाने सोमवारी काहीशी विश्रांती घेतली होती. मंगळवारी पहाटेपासून पावसाने पुन्हा जोर धरला. अधूनमधून पावसाच्या मध्यम स्वरूपाच्या सरी येत होत्या. मंगळवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत जिल्ह्यामध्ये ६१.२ मिमी पावसाची नोंद झाली. सुधागड तालुक्यात सर्वाधिक ९९.५ मिमी पाऊस पडला. उत्तर रायगडात पावसाचा जोर कमी होता.

# लाचखोर महिला तलाठी जेरबंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

वडिलोपार्जित मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर वडिलांच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारस म्हणून नोंद करण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना अलिबाग तालुक्यातील बामणोलीच्या महिला तलाठीला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. पल्लवी यशवंत भोईर (वय ३९) लाचखोर तलाठीचे नाव आहे. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली.

पल्लवी भोईर यांची खंडाळा तलाठी म्हणून मूळ नेमणूक आहे. त्यांच्याकडे बामणोलीचा अतिरिक्त कार्यभार होता. ४ जुलै रोजी लोणारे येथील तक्रारदार यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे वडिलोपार्जित सातबारा उताऱ्यावर वारस म्हणून नोंद होण्यासाठी त्यांनी तलाठी सजा कार्यालयात अर्ज केला होता. **(पान २ वर..)**

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत विविध शाळांमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहू नये या उदात्त हेतूने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून काम करीत आहे, असे प्रतिपादन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष तथा मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मंगळवारी (दि. ४) केले. ते वह्यावाटप कार्यक्रमात बोलत होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी वह्यांचे वाटप करून गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी मदत करण्यात येते. गेल्या तीन दशकांपासून सुरू असलेला हा उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत मंगळवारी पनवेल तालुक्यातील नेरे हायस्कूल नेरे भागशाळा, कोप्रोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विहिघर हायस्कूल, केवाळे जिल्हा परिषद शाळा, एसईएस माध्यमिक विद्यालय आणि काळुंद्रे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

(अधिक छायाचित्रे पान ६वर..)



वह्यावाटप कार्यक्रमास विविध शाळांमध्ये भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच नीलिमा निलेश पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, ग्रामपंचायत सदस्य राम पाटील, दिनेश मानकामे, राम पाटील, वंदना रोडपालकर, कल्पना वाघे तसेच बाळकृष्ण गवते, वासुदेव गवते, शांताराम पाटील, एकनाथ पाटील, रामदास पाटील, सदानंद मेस्त्री, किशोर कन्हेरे, सुनील दत्तात्रेय पाटील, गोटीराम म्हात्रे, अनंता पाटील, विद्याधर चोरघे, हेमंत मानकामे, डॉ. रोशन पाटील, मुख्याध्यापक डी. एस. धोत्रे, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, विकास फडके, माजी सरपंच शरद गायकर, सामाजिक कार्यकर्ते राजाराम माळी, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, रघुनाथ बहिरा, बाळाराम चिखलेकर, नरेश घरत, शंकर म्हात्रे, गणेश घरत, विशाल म्हस्कर, सचिन चिखलेकर, हर्षद कांडपिळे, प्रभाकर चिखलेकर, वसंत घरत, भाजप भटके विमुक्त महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, युवा नेते शुभ पाटील, केंद्र प्रमुख एन. के. गीते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# मंत्रिमंडळ बैठकीत विविध विषयांना मंजुरी

## राज्याच्या विकासाला मिळणार चालना

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. ४) झालेल्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि सहकारी मंत्री उपस्थित होते.

राज्यातील मत्स्यबीज, कोळंबीबीज उत्पादन व संवर्धन केंद्र यांच्या भाडेपट्टी कालावधीत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार विभागाकडील सात केंद्र वगळता भाडेपट्ट्याने देण्यात आलेली व नव्याने भाड्याने देण्यात येणारी मत्स्यबीज, कोळंबीबीज केंद्रांचा भाडेपट्टा कालावधी आता १५ऐवजी २५ वर्षे करण्यात येईल. मत्स्यशेतकरी, मत्स्यसंवर्धक, मत्स्यकास्तककारांना उत्तम प्रतीचे मत्स्यबीज, कोळंबी बीजाचा पुरवठा व्हावा यासाठी एकूण ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्र, ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्र व दोन कोळंबी बीज उत्पादन केंद्र व एक कोळंबी बीज संवर्धन केंद्र याप्रमाणे ६७ केंद्र स्थापन करण्यात आली होती.

यातील काही केंद्रे ही जीर्ण झाल्यामुळे त्यापैकी २० केंद्र १५ वर्षांकरिता भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. केंद्राची दुरुस्ती व त्यापासून मिळणारे उत्पन्न यामुळे कमी कालावधीकरिता भाडेपट्टाधारक गुंतवणक करत नसल्याने हा भाडेपट्टा कालावधी शासनाकडील सात केंद्र वगळता १५ वर्षांवरून २५ वर्षांचा करण्यास मान्यता देण्यात आली. यातून मिळणारे उत्पन्न विभागाच्या मत्स्यविकास कोषमध्ये ठेवण्यास व त्यातून केंद्र चालवणे, संशोधनात्मक कामे, पायाभूत सुविधा तसेच विभागाच्या विकासात्मक कामासाठी खर्च करण्यासदेखील मान्यता देण्यात आली.



नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक तालुक्यातील कळमुस्ते आणि दिंडोरी तालुक्यातील चिमणपाडा येथील प्रवाही वळण योजनेस बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. कळमुस्ते योजनेमुळे गोदावरी खोऱ्यातील पाणीसाठा १३.६८ किमीच्या बोगद्याद्वारे प्रवाही पद्धतीने वळविण्यात येईल. यामुळे गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तूट काही प्रमाणात भरून निघेल. यासाठी ४९४ कोटी ९८ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

नागपूर येथील शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्सच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी ३५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. या कर्मचाऱ्यांना कोणतीही वेतन थकबाकी पूर्वलक्षी प्रभावाने मिळणार नाही. यासाठी एक कोटी १७ लाख ३ हजार ४६८ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती, न्यायमूर्ती किंवा त्यांचे हयात असलेले पती किंवा पत्नी यांना घरकाम, वाहनचालक तसेच दूरध्वनी खर्चाचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. सेवानिवृत्त न्यायमूर्तींना एक घरकामगार आणि एक वाहनचालक यांची कंत्राटी पद्धतीने सेवा घेण्यासाठी उच्च न्यायालयामार्फत खर्च देण्यात येईल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील आंबोली आणि गेळे या गावातील शेतकऱ्यांना कबुलायतदार गावकर पद्धतीत जमीन वाटप करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत नागपूर येथील कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करण्याचा निर्णयही या वेळी घेण्यात आला. या केंद्रासाठी २२७ कोटी ४६ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

**मराठा, कुणबी विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

*राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी–मराठा, मराठा–कुणबी या जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीसाठी सजायीराव गायकवाड–सारथी शिष्यवृत्ती योजनेस मान्यता देण्यात आली. या योजनेतून दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल. क्यु–एस वर्ल्ड रँकिगमध्ये २००च्या आता मानांकन असलेल्या शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. ही योजना २०२३–२४पासून राबविण्यात* येईल. या योजनेसाठी पाच वर्षांकरिता २७५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून पहिल्या वर्षासाठी २५ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

# आदिवासी कोळी बांधवांवर अन्याय होऊ देणार नाही -राज्यपाल



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रातील आदिवासी कोळी बांधवांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याच्या अनुषंगाने सोमवारी (दि. ३) राजभवनात राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली कोळी महासंघाचे शिष्टमंडळासोबत बैठक झाली. या बैठकीसाठी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपा व विधान परिषदेचे नवी मुंबईतील आमदार रमेश पाटील यांनी पुढाकार घेतला होता.

या बैठकीमध्ये आमदार रमेश पाटील यांनी महाराष्ट्रातील विस्तारित क्षेत्रातील आदिवासी कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, डोंगर कोळी इ. जमातींना जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र देताना जात पडताळणी समितीकडून कशाप्रकारे जाणीवपूर्वक भेदभाव केला जातो आणि शासकीय लाभापासून वंचित ठेवले जाते हे राज्यपालांच्या निदर्शनास आणले.

कोळी महासंघाचे युवा प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील यांनी महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, कोकण या विभागातील अनुसूचित जमातीतील बांधवांची जात वैधता प्रमाणपत्राची प्रकरणे जात पडताळणी समितीमार्फत जाणीवपूर्वक अवैध ठरवण्यात येतात, परंतु त्यानंतर न्यायालयात अपील केल्यानंतर या अनुसूचित जमातीतील बांधवांची जात वैधता प्रमाणपत्र वैध ठरल्याची अनेक उदाहरणे दाखवून दिली, तसेच जात पडताळणी समितीच्या कार्यपद्धतीवर बंधने आणली पाहिजेत असे सांगून याबाबतीत आपल्या मार्फत व सरकारमार्फत मार्गदर्शक सूचना दिल्या गेल्यास गोरगरीब जनतेला न्यायालयात धाव घेण्याची आवश्यकता भासणार नाही याकडे राज्यपालांचे लक्ष वेधले.

प्रा. शरण खानापुरे यांनी टीएसपी आणि ओटीएसपीमध्ये भेदभाव करून ओटीएसपी क्षेत्रातील साडेपाच टक्के आदिवासी जमातींना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जात असल्याने त्यावर आपल्या मार्फत निर्देश व्हावेत, अशी विनंती राज्यपाल महोदयांना केली.

शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर राज्यपाल महोदयांनी आदिवासी कोळी समाजावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी माझ्या वतीने आदिवासीमंत्री व आदिवासी विकास विभागास निर्देशित करण्यात येईल, असे सांगून यासंदर्भात विस्तृत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन दिले.

या वेळी प्रकाश बोबडी, राजहंस टपके, देवानंद भोईर, शिवशंकर फुले, सतीश धडे, अविनाश कोळी, मुकेश सोनवणे, गीतांजली कोळी, बाळासाहेब सैंदाणे, शंकर मनाळकर, राम सुरडकर, धीरज सनगाळे, दत्तात्रय सुरवसे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सहकाऱ्यांसह मंत्रालयात केले महापुरुषांना अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य मंत्रिमंडळात अलिकडेच समाविष्ट करण्यात आलेल्या मंत्र्यांसह मंत्रालयातील माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

मंत्री सर्वश्री छगन भुजबळ, दिलीप वळसे–पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, संजय बनसोडे, अनिल पाटील आणि आदिती तटकरे यांनीही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी मुख्य सचिव मनोज सौनिक, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह लोकप्रतिनिधी, मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सामाजिक बांधिलकी जपत बौद्धविहाराची डागडुजी

**उरण : बातमीदार**

आषाढ पौर्णिमा व वर्षावासनिमित्त उरण बौद्धवाडी येथे उद्योजक तेजाब म्हस्के यांनी नव्याने लादी लावली व बुद्धविहारमध्ये प्रकाश धर्मा कांबळे यांनी पत्नी पुष्पा कांबळे यांच्या स्मरणार्थ गौतमबुद्धांची स्पाटेक लादी भेट दिली. रोहित रवींद्र कांबळे यांनी बुद्धविहाराला ऑईल पेंटकलर लावून दिला आहे.



या उद्घाटनावेळी उद्योजक रूषिकेश म्हस्के व उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीष निकम, अध्यक्ष प्रकाश कांबळे, सचिव विजय पवार, विनोद कांबळे, हर्षद कांबळे, अखिलेश जाधव, जितेंद्र भोरे, संतोष कांबळे, विशाल कवडे, हरिश्चंद्र गायकवाड, धनेश कासारे, अजय कवडे, माता रमाई महिला मंडळ अध्यक्ष सुनिता सपकाळे, करुणा भिंगावडे, स्वप्नाली कवडे, संगिता जाधव, गीता कांबळे, रुजा कवडे, चंद्रभागा जाधव सर्व उपासक व उपासिका उपस्थित होते.

## लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे डेस्क किट वाटप

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे तक्का येथील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना डेस्क किट वाटप करण्यात आले.

आयआयटी, कानपूर येथे बनवलेल्या या डेस्क किट मध्ये सॅक व लिहिण्याचे टेबल असून विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग होईल, असा विश्वास पनवेल सरगम क्लबच्या अध्यक्ष स्वाती गोडसे यांनी व्यक्त केला. यापुढे विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय शिबिर आयोजित करणार असल्याचे ला. स्वाती गोडसे यांनी सांगितले.

तक्का शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या सावळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन वैभव पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला मानदा पंडित, प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, सतीश ठाकूर आदी उपस्थित होते.




## खंडित वीजपुरवठ्यामुळे खारघरकर त्रस्त

### माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांचे महावितरणला निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील प्रभागातील काही सेक्टरमध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. याबाबत महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंता खारघर सेक्टर १९ यांना निवेदन दिले व अखंडित वीजपुरवठा करण्याची मागणी केली.

त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खारघर शहरातील सेक्टर २०, २१मध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांच्याकडे केल्या आहेत. या दोन सेक्टरमध्ये मागील अनेक महिन्यांपासून दर दोन दिवसांनी दोन ते तीन तास वीजपुरवठा खंडित होत असतो व त्यामुळे रहिवाशांना तसेच व्यावसायिकांना अडचण निर्माण होत आहे.

वीजग्राहक हे आपले देयक वेळेवर भरत असतात. त्यामुळे त्यांची महावितरणकडून अखंडित वीजपुरवठा मिळावा ही अपेक्षा असते, परंतु वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे ग्राहक त्रस्त झालेले आहेत.

कार्यालयात फोन केल्यास बहुतांश वेळा फोन उचलला जात नाही व उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. याबाबत महावितरणकडून तत्काळ उपाययोजना करावी अन्यथा नागरिकांसह आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

## मध्य रेल्वेकडून सर्वोत्कृष्ट ७.४० दशलक्ष टन मालवाहतूक

### गतवर्षीच्या तुलनेत वाढ

**रोहे : प्रतिनिधी**

या वर्षी मध्य रेल्वेच्या मलवाहतुकीमध्ये जून महिन्यात गेल्या वर्षाच्या जून महिन्यातील मालवहातुकीपेक्षा वाढ झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने मध्य रेल्वेचे जून २०२३ महिन्यासाठी ७.४० दशलक्ष टन मालवाहू लोडिंग, जून २०२२ महिन्यासाठी ८.१७ दशलक्ष टन लोडिंगच्या तुलनेत, ३.०६ टक्के वाढीसह, जूनच्या कोणत्याही महिन्यात आतापर्यंतचे सर्वोत्तम लोडिंग आहे.

मध्य रेल्वेने जून २०२२मधील ७२०.९ रु. कोटींच्या तुलनेत जून २०२३ मध्ये ८०६.१० रु. कोटींचा मूळ मालवाहतूक महसूल मिळवला आहे. मध्य रेल्वेने सर्व कमोडिटीजमध्ये कामगिरी सुधारली आहे. ज्यामुळे ती गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत वाढीव लोडिंग साध्य करू शकली आहे.

मध्य रेल्वेने जून २०२२मध्ये १७८ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये सिमेंट आणि क्लिंकरचे २३६ रेक



लोड केले आहेत. जून २०२२मध्ये ६८ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये ऑटोमोबाईल्सचे ९७ रेक लोड करण्यात आले आहेत. जून २०२३मध्ये कंटेनर लोडिंगमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.६ टक्क्यांनी सुधारणा झाली असून जून २०२२ मध्ये २५९८ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये २६४५ रेक लोड करण्यात आले आहेत.

जून २०२२मध्ये ११५ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये पेट्रोलियम उत्पादनांचे २११ रेक लोड करण्यात आले आहेत. जून २०२२मधील ८५ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये १५२ लोह आणि स्टीलचे रेक लोड होत आहेत.

जून २०२२मधील ६५ रेकच्या तुलनेत जून २०२३मध्ये ६८ लोहखनिजाचे रेक लोड करणे. एनटीकेएम जे एक किमीवर वाहून नेणारे एक टन पेलोड आहे जून २०२२च्या तुलनेत जून २०२३मध्ये ६.८ टक्के वाढले आहे, अशी माहिती जनसंपर्क विभाग छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई मध्य रेल्वे कार्यालयातून देण्यात आली आहे.

पान १ वरुन

### लाचखोर महिला तलाठी जेरबंद

या कामासाठी तलाठी पल्लवी भोईर यांनी तक्रारदार यांच्याकडे पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदारांनी याबाबत रायगडच्या अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार केली. या तक्रारीची खात्री करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तलाठी पल्लवी भोईर यांच्यावर पाळत ठेवून सापळा रचला. त्यानुसार मंगळवारी तक्रारदाराकडून तलाठी भोईर यांनी पाच हजार लाच स्वीकारताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने भोईर यांना जेरबंद केले.

पोलीस निरीक्षक नवनाथ चौधरी, हवालदार महेश पाटील, शिपाई सचिन आटपाडकर, नाईक स्वप्नाली पाटील यांनी ही कारवाई केली.

## राष्ट्रवादी सरकारमध्ये दाखल झाल्याने 'मविआ' नामशेष –आमदार नितेश राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच शिवसेना–भाजपसोबत सरकारमध्ये सामील झाल्याने आता महाविकास आघाडी पूर्णपणे नामशेष झाली आहे, अशी टीका भाजपचे आमदार नितेश राणे यांनी सोमवारी (दि. ३) केली. या वेळी भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते अभिषेक मिश्रा, ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

आमदार राणे म्हणाले की, २०१९ साली जनमताचा अपमान करत मुख्यमंत्रीपदाच्या लालसेने उद्धव ठाकरेंनी भाजपला दगा देऊन राजकारणाचा चिखल केला होता.



तेच आज उचरवात भाजपवर टीका करीत अकलेचे तारे तोडत आहेत हे हास्यस्पद आहे. तुम्ही जे २०१९ साली केले तो महाराष्ट्र धर्म होता, मात्र आम्ही जे केले तो महाराष्ट्र द्रोह असे बोलण्यास जीभ धजावते कशी? असा सवाल त्यांनी केला.

तीन पक्षांची महाविकास आघाडी स्थापन झाल्यापासून संजय राऊत यांच्याकडून व दै. सामनामधून सातत्याने अजित पवार यांच्यावर टीका करण्यात येत होती. शरद पवार यांचे घर फोडण्याचा एक कलमी कार्यक्रम संजय राऊत यांनी हाती घेतला होता. राऊत यांच्या घाणेरड्या राजकारणामुळेच महाराष्ट्रात ही स्थिती उद्भवली. अजित पवारांच्या शपथविधीनंतर समाधान मिळाल्याने राऊत यांचा आत्मा शांत झाला असावा, अशी घणाघाती टीका आ. राणे यांनी केली. पवारांनंतर आता संजय राऊत यांचे पुढचे लक्ष्य हे काँग्रेसमध्ये फूट पाडणे हे असल्यानेच सातत्याने नाना पटोले यांना लक्ष्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## पेण एसबीआयचे कॅशियर राजेंद्र हाटकर सेवानिवृत्त

**पेण : प्रतिनिधी**

स्टेट बँकेचे कॅशियर राजेंद्र हाटकर हे आपली सेवा बजावून सेवानिवृत्त झाले. यानिमित्त बँकेच्या शाखेत निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

राजेंद्र हटकर यांनी फेब्रुवारी १९८३मध्ये लष्करमध्ये भरती होऊन १६ वर्षाच्या सेवेनंतर १९९९मध्ये निवृत्त झाले. २००० साली बँकेत गार्ड म्हणून कामाला लागले. त्यानंतर सप्टेंबर २००८मध्ये बँकेची परीक्षा देऊन खजिनदार म्हणून व २३ वर्षांच्या बॅंकिंग सेवेनंतर बँकेचे स्पेशल असिस्टंट म्हणून निवृत्त झाले. कार्यक्रमास मुंबई येथील उपमहाव्यवस्थापक संजय शर्मा, पेण शाखेचे व्यवस्थापक सुनिल कुमार, उपव्यवस्थापक पुजा कुमारी, सौ. रसिका हाटकर, रोशन हाटकर, रेश्मा पिळवणकर, वैभव लोखंडे, गिरिजा ओक, राहुल जैतपाल, मयुर पिळवणकर, गौरव ओक, पेण तालुका सेवानिवृत्त माजी सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र ठाकूर, संतोष तावडे, बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### दुखवटा

**यमुना वाडेकर**

**पेण :** पेणमधील हरी चणेवाले यांच्या पत्नी यमुना हरिश्चंद्र वाडेकर यांचे वयाच्या ६८व्या वर्षी अल्पशा आजाराने मुंबई येथील रुग्णालयात सोमवारी (दि. ३) निधन झाले. चणे विक्रीचा व्यवसाय करताना सर्वांशी मिळून मिसळून राहून वाडेकर कुटुंबियांनी परिसरात एक चांगले वलय निर्माण केले होते. सध्या ते नंदीमाळ नाका येथे राहत होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी १२ जुलै रोजी व तेरावे नंदीमाळ नाका येथील राहत्या घरी १५ जुलै रोजी होणार आहे. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र झिंजे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.




## संपादकीय

# वज्रमूठ उघडी पडली

एकीकडे विरोधकांच्या वज्रमूठ सभा सुरू होत्या, एकजुटीचे सोंग आणले जात होते, तेव्हाच दुसरीकडे किंवा त्याच्याही कितीतरी आधीपासून सत्तेसाठी भाजपसोबत एकेकट्याने गुफ्तगू सुरू होते असे काही नेत्यांच्या ताज्या गौप्यस्फोटांतून उघड होऊ लागले आहे. अशा विरोधकांच्या एकजुटीवर मतदार विश्वास कसा ठेवणार हाच खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील विरोधीपक्षांची अवस्था सध्या कमालीची करूण आहे. भाजपसारख्या बलाढ्य पक्षाला एकत्र तोंड देण्याची ताकद त्यांच्यामध्ये उरलेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

**एक वर्षापूर्वी सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष घायाळ अवस्थेत शिंदे-फडणवीस सरकारवर तोंडसुख घेत होते. शिव्यांची लाखोली वाहण्याच्या कार्यक्रमातच महाविकास आघाडीचे एक वर्ष निघून गेले. सत्तेवर आल्याआल्या शिंदे-फडणवीस सरकारने मोठमोठ्या निर्णयांचा धडाका लावत महाराष्ट्राचा कारभार गतिमान केला तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे तिन्ही पराभूत घटक पक्ष वज्रमूठ सभा घेत गावोगाव फिरत होते. वज्रमूठ सभेचा काहीही उपयोग होत नाही हे लक्षात आल्यानंतर तो हास्यास्पद प्रकार अखेर बंद करण्यात आला. 'पावसाळ्यानंतर बघू' अशी मखलाशी करत तिन्ही पक्ष आपापल्या घरातील बंडाळी शमवण्यासाठी धडपड करू लागले हेच आता उघड होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ४० आमदारांचे मोठे पाठबळ होते आणि सर्वोच्च न्यायालयानेही त्यांनी केलेल्या उठावावर एक प्रकारे शिक्कामोर्तब केले, निदान शिंदे-फडणवीस सरकार हे घटनाबाह्य सरकार नाही एवढे तरी स्पष्ट झाले. ठाकरे गटाची अवस्था दयनीय होऊन गेली. उरलेल्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्यासाठी त्यांना आजही आटापिटा करावा लागत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्येदेखील सारे काही आलबेल नव्हते. भारतीय जनता पक्षासोबत सत्तेत सहभागी होण्याविषयी ५१ आमदारांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना वर्षभरापूर्वीच पत्र दिले होते, परंतु पाटील यांनी ते पुढे शरद पवार यांच्याकडे पाठवलेच नाही अशी माहिती आता उघड होत आहे. ही माहिती पक्षप्रतोदपदी नुकतीच निवड झालेल्या जितेंद्र आव्हाड यांनीच पत्रकार परिषदेत दिली. इतकेच नव्हे तर एकनाथ शिंदे यांच्या बंडाची तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांना निश्चितच लगेचच माहिती मिळाली होती, असा सनसनाटी आरोप आव्हाड यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनीही पक्षाच्या बहुसंख्य आमदारांचे मत भाजपसोबत जाण्याचेच आहे, असे पवारांच्या कानावर घातल्याचे म्हटले आहे. शिंदे आणि त्यांचे सहकारी गुवाहाटीत होते, तेव्हाच राष्ट्रवादी भाजपच्या वरिष्ठांसोबत चर्चा करत होती, असा गौप्यस्फोट त्यांनी केला. राहता-राहिला काँग्रेस पक्ष. तेथेही प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरुद्ध कुरबुरी सुरूच आहेत. एक वर्षापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाल्यानंतर ठाकरे गटाची शक्ती क्षीण होत गेली. वर्षभरानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसाच उठाव करत विरोधकांची हवाच काढून घेतली. काँग्रेसकडे ना धड नेतृत्व आहे, ना कार्यकर्त्यांची फौज. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे चाचपडणे अजुनही सुरूच आहे. या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील ४८ पैकी ४५ जागा जिंकण्याचे भाजपचे लक्ष नक्कीच गाठता येईल, असा विश्वास वाटतो. एकंदरीत महाराष्ट्रापुरती तरी लोकसभेची लढाई एकतर्फी होणार अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत. विरोधीपक्षांनी एकजुटीचे सोंग आवरते घेऊन प्रत्यक्ष कामाला लागावे. त्यातच त्यांचे भले आहे.**

# राज्य शासनाचे लोकाभिमुख निर्णय




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला एक वर्ष पूर्ण होत आहेत. या वर्षभरात या शासनाने अनेक लोकउपयोगी निर्णय घेतले आहेत. सर्व समावेशक धोरण शासन राबवित आहे. तळागळातील वंचित घटकाला न्याय मिळावा यासाठी हे शासन कार्य करत आहे. पालघर जिल्ह्यासाठी या शासन काळात अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत. शासन आपल्या दारी या अभियानाच्या प्रचंड यशामुळे सर्वसामान्य जनतेसाठी राज्य शासन कार्य करत असल्याचे दिसून येते.

शासन आपल्या दारी या अभियानामध्ये राज्यातील ३५ लाख लाभार्थ्यांना विविध योजनेचा लाभ झाला आहे. तर पालघर जिल्ह्यामध्ये २ लाख पेक्षा अधिक लाभार्थींनी विविध योजनेचा लाभ घेतला आहे. पालघर जिल्ह्यासाठी या वर्षभरात राज्य शासनाने भरीव निर्णय घेतले आहेत. सर्वसामान्य व्यक्ती केंद्र बिंदू मानुन या योजनेची जिल्ह्यामध्ये अंबलबजावणी करण्यात आली आहे. राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी तसेच अनाधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती धोरण १९ एप्रिल २०२३ रोजी जाहिर करून त्याची अंमलबजावणी सुरू केलेली आहे. या धोरणानूसार प्रायोगिक तत्वावर एका वर्षांसाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. त्याशिवाय जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व वाहतूक परवाना सेवा शुल्क इत्यादी खर्च देखील आकारण्यात येईल. यात स्वामित्व धनाची रक्कम माफ करण्यात आली आहे. कामगार विभागामार्फत विटभट्टी कामगार, मनरेगा कामगार व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येवून मागील वर्षी ३५९ कामगारांच्या संदर्भात विविध योजनांतर्गत ४५ लाख २१ हजार अर्थसहायाचे वाटप करण्यात आले आहे. सद्यस्थितीत मनरेगा व विटभट्टी कामगारांच्या नोंदणीला प्राधान्य देत असून एकुण २७ हजार २५९ कामगारांना मध्यान्ह अथवा रात्रीच्या भोजनांचे वाटप करण्यात येत आहे. आदिवासी विकास प्रकल्प जव्हार अंतर्गत कार्यरत असलेल्या ३० शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना ६२५ टॅबचे वाटप करण्यात आले. त्यामूळे विद्यार्थ्यांना विविध विषयाचा संग्रहित केलेल्या माहितीचा अभ्यास करण्यास मदत होईल.

पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू प्रकल्पांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी यांचे नेतृत्वाखाली जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी प्रत्येकी एक आश्रमशाळा दत्तक घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या आश्रमशाळांमध्ये सर्व सोई-सुविधा निर्माण करून पंचतारांकीत करण्याचा मानस आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व गुढीपाडव्याच्या निमित्ताने जिल्ह्यातील तीन लाख ९० हजार कुटुंबांना शासनामार्फत आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला. आनंदाचा शिधा यामध्ये एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो डाळ व एक किलो खाद्य तेल फक्त १०० रुपयामध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत पालघर जिल्ह्यातील जनतेची अन्न सुरक्षा साध्य करण्यासाठी अंत्योदय अन्न योजनेमध्ये ९९ हजार ११५ कुटुंबांना प्रति महिना ३५ किलो धान्य मोफत दिले जाते. तसेच प्राधान्य कुटुंब योजने अंतर्गत १४ लाख ५० हजार लाभार्थ्यांना प्रति महिना पाच किलो धान्य मोफत दिले जाते.

सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर या विभागामार्फत केंद्र शासनाच्या डीईसी प्रकल्पांतर्गत केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त भागीदारीतून उड्डाणपुलांची कामे प्रगतीत आहेत. त्यापैकी कोळगाव येथील रेल्वे उड्डाणपूल ४७अ चे काम पूर्ण झाले असून हा पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

अफवांना प्रतिबंध घालणे, जनता व पोलीस यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे व एकंदरीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी पोलीस विभागामार्फत जनसंवाद अभियान सुरू करण्यात आला आहे. जनसंवाद कार्यक्रमासोबत पोलीस दलाने रोजगार मेळाव्याचे आयोजन देखील केले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये १० हजार तरुणांनी सहभाग नोंदविला असून जवळपास दोन हजार तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. कायदा सुव्यवस्था राखण्यासोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य पोलीस दलांनी केले आहे.

जनसंवाद अभियानास पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून स्थानिक लोकांच्या प्रतीसादातून बऱ्याचश्या कायदा व सुव्यवस्थेच्या विरोधी घटनांना प्रतीबंध घालण्यास मदत झाली आहे. तसेच वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल करण्यात यश आलेले आहे. पालघर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पोलीस ठाणे व कार्यालय आयएसओ नामांकन करण्याच्या उद्देशाने पोलीस ठाणे व कार्यालय दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

पालघर जिल्हयांतर्गत वसई-विरार शहर महापालिका येथे १२ व इतर शहरी भागांमध्ये १५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र १५ व्या वित्त आयोग अंतर्गत स्थापन करण्यात येत आहेत. या दवाखान्यापैकी प्रति नागरी क्षेत्रात एक अशा प्रकारे आठ ठिकाणी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वीत करण्यात आला आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत तीन हजार ७७७ कुटुंबांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये १०६ सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८९८ गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सद्यस्थितीत २४७ कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०२२-२३ पर्यंत एकूण २५ हजार ५६४ उद्दिष्टांपैकी २४ हजार ८७८ घरकुले पूर्ण झालेली आहेत. राज्य पुरस्कृत आवास योजने अंतर्गत २०२२-२३ पर्यंत सात हजार ३७३घरकुले पुर्ण झालेली आहेत. तसेच शबरी आवास योजना २०२२-२३करिता दोन हजार २९० लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ मध्ये आराखडा मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये रेट्रो फिटिंगच्या योजना २०६ व नवीन योजना ३५८ अशा एकूण ५६९ योजनांचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजनांमध्ये गावातील सर्व पाडे/वाड्या यांचा समावेश करण्यात आला आहे. या आराखड्यातील ५४४ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. जिल्हयातील एक लाख ४७ हजार ८८९ कुटुंबांना घरगुती नळ जोडणी देण्यात आली आहे.

**-राहुल भालेराव**
**जिल्हा माहिती अधिकारी, पालघर**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपची चॅट हिस्ट्री आता झटपट करा ट्रान्सफर




व्हॉट्सअ‍ॅपने आपल्या युजर्सना मोठा दिलासा दिला आहे. आतापर्यंत व्हॉट्सअ‍ॅप चॅट ट्रान्सफर करणं हे एक मोठं काम होतं. पण आता युजर्स फक्त ट्ठ स्कॅन करून व्हॉट्सअ‍ॅप चॅट्स ट्रान्सफर करू शकतील. यासाठी व्हॉट्सअ‍ॅप युजर्सना क्लाउड बॅकअपची गरज नाही. युजर्स थेट वाय-फायवर चॅट हिस्ट्री ट्रान्सफर करण्यास सक्षम असतील. त्यासाठी वाय-फाय डायरेक्टची मदत घेतली जाणार आहे.

वाय-फाय डायरेक्ट फीचर दोन डिव्हाईसमध्ये सहज चॅट ट्रान्सफर करण्याची सुविधा देते. यासाठी दोन डिव्हाईस वाय-फायशी जोडावी लागतील. दोन्ही डिव्हाईस एकमेकांच्या जवळ ठेवावी लागतात. मग ते वाय-फायशी कनेक्ट करावे लागेल. यासोबतच लोकेशनही चालू करावे लागेल. यानंतर, ज्या स्मार्टफोनमधून व्हॉट्सअ‍ॅप चॅट ट्रान्सफर करायचे आहे तो स्मार्टफोन चालू करा. फोनचं लॉक ओपन करा.

फोनमधील सेटिंग्ज ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर व्हॉट्सअ‍ॅप चॅट ट्रान्सफर पर्यायावर क्लिक करा. यापुढे ट्ठ कोड दिसेल. नवीन फोनवरून व्हॉट्सअ‍ॅप चॅट हिस्ट्री स्कॅन करावी लागेल. नवीन फोनमध्ये व्हॉट्सअ‍ॅप डाउनलोड करावे लागेल. यानंतर फोन नंबर रजिस्टर्ड करावा लागणार आहे.

क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर दुसरा फोन वाय-फाय डायरेक्टशी कनेक्ट करावा लागेल. व्हॉट्सअ‍ॅप चॅट ट्रान्सफर करण्याची रिक्वेस्ट स्वीकारावी लागेल. त्यानंतर चॅट नवीन फोनवर ट्रान्सफर होईल. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे. व्हॉट्सअ‍ॅप हे संवाद साधण्याचं प्रभावी माध्यम असून मोठ्या प्रमाणात त्याचा वापर केला जातो. व्हॉट्सअ‍ॅपदेखील आपल्या युजर्ससाठी सातत्याने नवनवीन फीचर्स आणत असतं.

# रहस्यकथाकार बाबूराव अर्नाळकर



## निमित्त

चंद्रकांत सखाराम चव्हाण उर्फ बाबूराव अर्नाळकर यांचा आज स्मृतिदिन. चंद्रकांत चव्हाण हे बाबूराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक होते.

बाबूराव अर्नाळकर यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. मॅट्रिकच्या वर्गात असताना शाळा सोडलेले बाबूराव मराठीतील आघाडीचे रहस्यकथा लेखक होते. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या. खर्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली. चार आणे मालांपासून त्यांनी सुरुवात केली. त्यांचे नायक झुंजार, धनंजय-छोटू, मेजर सुदर्शन, इन्स्पेक्टर दिलीप, दर्यासारंग हे मराठी घरांघरांतून फिरले. तत्कालीन लोकप्रिय कादंबरीकार ना. सी. फडके यांच्या कादंबर्यांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या चोरून वाचल्या.

ज्या काळात साने गुरुजी आणि वि. स. खांडेकर यांचे आणि ऐतिहासिक चरित्रांचे वाचन हेच शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जात होते त्या काळात मुखपृष्ठावर पाठीत सुरा खुपसलेला मृतदेह आणि किंचाळणारी स्त्री असली चित्रे असलेली बाबूरावांची पुस्तके चोरूनच वाचली जात. १९४२ च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबूरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबूरावांना पडलेले कोडे होते. बाबूरावांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्गकिल्ल्यात गेले आणि परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली; ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबूरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबूरावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबूरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही.

येरवडच्याच्या तुरुंगात असताना विसापूरच्या तुरुंगातील काही राजकीय कैद्यांनी लढा देऊन सर्वच तुरुंगांतील राजकीय कैद्यांना वाचनासाठी पुस्तके पाठवावयास शासनाला भाग पाडले. अशा काही पुस्तकांतून एडगर वॅलेस यांची 'थ्री जस्ट मेन' ही कथा बाबूराव अर्नाळकर यांच्या हाती पडली आणि सामान्यांसाठी काय लिहायचे ते समजले. बाबूरावांचे स्नेही प्रभू हे रहस्यमाला काढीत असत.

१९४२ च्या फेब्रुवारीत बाबूरावांनी लिहिलेली 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यकथा पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. बाबूरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण त्या कथांना मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा. कथेत कुठेही अश्लीलपण येऊ न देण्याची खबरदारी बाबूराव घेत आणि कथेचा शेवट नेहमी 'सत्यमेव जयते' असाच असे. कथेतील प्रसंग वेगळे असले तरी नायक एकच ठेवायचा हे बाबूरावांनी निश्चित केले होते. नायकाचे नाव बाबूरावांना गीता वाचताना सुचले आणि त्यांनी धनंजय हे नाव मुक्रर केले. बाबूरावांचा कथानायक रुबाबदार, सुस्वभावी, समयसूचक आणि धडाडीचा असल्याने वाचकांना त्याच्या गुणविशेषांची, वागण्याची, बोलण्या चालण्याची चांगलीच ओळख असे. अशा या महान रहस्यकथाकाराचे ५ जुलै १९९६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : दमदार पावसामुळे शेतीकामांना वेग आला असून खरीप हंगामात शेतकरीवर्गाने स्वतःला झोकून दिले आहे.**

## आरोग्य प्रहर

# सतत ब्लॅक, लेमन टी पिण्याचे 'हे' साईड इफेक्ट्स

जगभरात कोट्यावधी चहाप्रेमी आहेत. भारतातही बहुतांश लोकांना दिवसभरात २-३ कप चहा पिण्याची आवड आणि सवयही असते. एखादी हेल्दी व्यक्ती १-२ कप चहा (tea) प्यायल्यास काहीच नुकसान नाही. मात्र कोणी त्यापेक्षा जास्त चहा प्यायल्यास त्यामुळे त्रास होऊ शकतो.



मुंबईत एका ४२ वर्षीय व्यक्तीला जास्त चहा पिण्याची सवय नडली, त्यामुळे त्याच्या किडनीवर परिणाम झाला व रुग्णालयात दाखल करावे लागले. खरंतर तो माणूस रोज ग्रीन किंवा लेमन टी पीत होता व त्यामध्ये व्हिटॅमिन सी घालत असे. कोरोनानंतर, व्हिटॅमिन सी चा ट्रेंड इतका वाढला की काही लोकांनी ते त्यांच्या दैनंदिन आयुष्यात समाविष्ट केले आहे, पण चहासोबत व्हिटॅमिन सी घेतल्याने किडनी आणि यकृतावर वाईट परिणाम होतो आणि इतर अनेक आजारांचा धोकादेखील वाढू शकतो.

**किडनी स्टोनचा धोका**

डॉक्टरांच्या सांगणायानुसार, कोविडच्या काळात रोज ब्लॅक टी व त्यासह व्हिटॅमिन सी सेवन करण्याचा ट्रेंड वाढला होता. पण प्रत्येक व्यक्तीला त्याची गरज नसते. ज्या व्यक्तींना आरोग्याच्या इतर समस्या आहेत, त्यांनी जास्त चहा आणि व्हिटॅमिन सी चे सेवन करणे अत्यंत घातक ठरते. चहाचे जास्त सेवन केल्याने शरीरावरही विपरीत परिणाम होतो.

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, अनेक कप ब्लॅक टी पिणे ही सवय अतिशय धोकादायक ठरू शकते. व्हिटॅमिन सी हे शरीरासाठी अतिशय आवश्यक असते. शरीराचा विकास आणि लोह शोषले जावे यासाठी व्हिटॅमिन सी ची गरज असते. आपल्याला दररोज ७५ ते ९० मिलीग्राम व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. हे मुख्यतः अन्नातून मिळते. जर कमतरता असेल तर डॉक्टर १००० मिलीग्रामपर्यंत व्हिटॅमिन सी सप्लिमेंट घेण्याची शिफारस करतात.

**जास्त चहा आणि व्हिटॅमिनमुळे अनेक आजार**

जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी घेतले तर ते शरीरात तुटते आणि ऑक्सलेटमध्ये बदलते. ज्यामुळे शरीरात कॅल्शियमचे प्रमाण वाढते आणि ते किडनी स्टोनच्या स्वरूपात दिसून येते. एवढेच नाही तर व्हिटॅमिन सीचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास यकृत, संधिवात तसेच किडनीचे आजार होऊ शकतात. जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी घेतल्यास किडनीच्या कार्यावर परिणाम होतो आणि काही प्रसंगी किडनी निकामीदेखील होऊ शकते.

# मांगूर हद्दपारीसाठी मत्स्य विभाग सक्रिय

## आज अलिबाग मुख्यालयात होणार बैठक

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मांगूर उत्पादकांना अरेरावी महागात पडणार असून मत्स्य विभागाचे सहाय्यक आयुक्तांनी या प्रकरणी पाटबंधारे विभाग, महावितरण, परिवहन विभाग, संबंधित ग्रामपंचायत सरपंच, पोलीस विभाग, गटविकास अधिकारी, प्रदूषण नियमक मंडळाचे अधिकार तसेच तक्रारदार यांची संयुक्त बैठक बुधवारी (दि. ५) अलिबाग येथे आयोजित केली आहे. मांगूर तलावावर कारवाईसाठी गेलेल्या महिला अधिकाऱ्याशी मांगूर उत्पादकाने दादागिरी केल्याने प्रकरण चांगलेच तापले आहे.

वरिष्ठ पातळीवरूनदेखील त्याची दखल घेण्यात आली असून गेल्या काही वर्षांपासून सातत्याने मांगूर उत्पादकांविरुद्ध लढा देणारे खालापूरातील शेतकरी शिवलिंग वाघरे यांनादेखील बैठकीला निमंत्रित करण्यात आले आहे.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे कारवाईसाठी मत्स्य विभाग रायगड यांना मर्यादा असल्याचे अधिकारी सांगत होते. अखेर मांगूर उत्पादनातील सर्वच घटक म्हणजे वाहतूक, तलाव ठिकाणी होणारा विद्युत पुरवठा, नदी प्रदूषित होत असल्याने प्रदूषण विभाग, पाटबंधारे विभागाची कोणतेही परवानगी न घेता नदीतील पाण्याचा उपसा, स्थानिक ग्रामपंचायतीचा आशीर्वाद यामुळे सरपंचांनादेखील बैठकिसाठी पत्र देण्यात आले आहे.

### नागरिकांच्या आरोग्याशी खेळ!

पाताळगंगा नदीलगत हे तलाव असून या तलावातील पाणी गटारातील पाण्यापेक्षा घाण आणि दुर्गंधीयुक्त आहे. सडलेले खाद्य मुंगूर माशांना खायला दिले जाते. तलावातील घाण पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने पाताळगंगा प्रदूषित होत आहे. अनेक पाणीयोजना पाताळगंगा नदीवर कार्यान्वित आहेत. त्यामुळे शेकडो कुटुंबांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.

**मांगूर माशांच्या मत्स्यसंवर्धनावर राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशाने बंदी घातलेली आहे. त्यानुसार कार्यालयाने वेळोवेळी कारवाई केली आहे, तरी मांगूर संवर्धन काही ठिकाणी सुरू असल्याच्या तक्रारी येत आहेत. या कारवाईत अन्य विभागांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. यासाठी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, अलिबाग येथे सभा आयोजित केली आहे.**

**–संजय पाटील,**
**सहाय्यक आयुक्त, मत्स्य विभाग रायगड**

**गेली काही वर्षे सातत्याने मांगूर तलावावर कारवाईसाठी पाठपुरावा करीत आहे. कारवाईनंतरदेखील तलाव पुन्हा सुरू होतो. उपोषणाचीदेखील तयारी केली होती. आता ठोस कारवाई होईल अशी अपेक्षा आहे.**

**–शिवलिंग वाघरे, खालापूर**



## कोर्लईत शासकीय जमिनीची खरेदी-विक्री; तिघांवर गुन्हा

**रेवदंडा :** कोर्लई हद्दीत बनावट खरेदी दस्ताऐवज बनवून शासकीय जमिनीची खरेदी-विक्री केल्याप्रकरणी तिघांवर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद मंडळ अधिकारी बोर्ली वीणा कोरेगावकर यांनी दिली. या फिर्यादीत म्हटले आहे की, कोर्लई येथील प्रितेश रोटकर, विनय महालकर, संजिवनी भगत (रा. उल्हासनगर) यांनी ६ ते २४ जून २०२२ दरम्यान शासकीय जमिनीचे बनावट खरेदी खत बनवून विक्री केली. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.


**PUBLIC NOTICE**

**MEDICAL RECORD DESTUCTION**
**PARAMOUNT MEDICAL SERVICES LTD**
**HOSPITAL, PANVEL**

Paramount Hospital Notice is hereby given that Paramount Hospital will be destroying Medical Records related to Admission / Visits and / or test Result performed at Paramount, Paramount House, Next to Rupalii Talkies Old Panvel, 410206.

**As per Hospital policy we have to maintain records of patients for a period of 5 years.**

In view of the above all Records up to 31st December 2017 have been selected for destruction will include all records for patients admission / visits / and Test Results will be destroyed on 20th July 2023.

Any person who has any objection or wish to acquire copies of their records may contact the Hospital before 19th July 2023.

Contact No. 27455610 /27453825/810491798

Director

Paramount Hospital


## विविध कामे करण्याच्या बहाण्याने महिलेला लुटले

### आरोपी महिलेला दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

घरकूल योजनेसह वेगवेगळी कामे करून देण्याचा बहाणा करून महिलेनेच महिलेची २४ हजार ५०० रुपयांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणी अलिबाग येथील न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी महिलेला दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

विमल श्रीकांत सुर्यवंशी उर्फ मंगल रवींद्र मोरे (वय ५५) असे या आरोपी महिलेचे नाव आहे. ही महिला मुळची पुणे जिल्ह्यातील असून भाड्याने वेश्वीमध्ये राहत होती. या महिलेच्या शेजारी सुनीता कांबळे या कुटूंबियांसमवेत राहतात. शेजारी असल्याने आरोपी विमलची सुनीता कांबळे यांच्याशी ओळख झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात घरकूल योजनेसंदर्भात काम करीत असल्याचे सांगून विमलने सुनीता कांबळे यांचा विश्वास संपादन केला. घरकूलचे काम करून दिले जाईल, त्यासाठी अर्ज भरण्यासाठी पाच हजार रुपये खर्च येईल असे सांगितले. हक्काचे घर मिळेल या आशेने सुनीताने ४ जुलै २०२२ रोजी आरोपी महिलेला पाच हजार रुपयांची रोख रक्कम दिली. त्यानंतर विमलने अर्ज भरला आहे, परंतु पुन्हा पाच हजार रुपये भरावे लागतील असे सांगून सुनीताकडून पाच हजार रुपयांची मागणी केली.

सुनीताने सोन्याचे दागिने बँकेत गहाण ठेवून पुन्हा पाच हजार रुपये दिले. त्यानंतर पुन्हा विमलने वेगवेगळी कारणे सांगून सुनीताची आर्थिक लूट करण्यास सुरुवात केली. एकूण २४ हजार ५०० रुपये आरोपी विमलने घेतले, परंतु कोणतेही काम करून दिले नाही. कामाबाबत व पैशांची विचारणा केल्यावर विमल उडवाउडवीची उत्तरे देऊ लागली.

आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे सुनीताच्या लक्षात आल्यावर ८ सप्टेंबर २०२२ रोजी विमलविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार केली. तत्कालीन पोलीस निरीक्षक शैलेश सणस यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रुपेश निगडे यांनी तपास सुरू केला. या तपासात विमलने आर्थिक लूट केल्याचे लक्षात आल्यावर तिला अटक करून अलिबाग येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

न्यायाधीश एस. डब्लू उगले यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. सरकार पक्षातर्फे ॲड. परीट यांनी काम पाहिले. विमल सुर्यवंशी या महिलेला दोषी ठरवत तिला दोन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

## मुरूडमध्ये व्यसनमुक्तीसाठी जनजागृती

**मुरुड : प्रतिनिधी**

अमली पदार्थांच्या सेवनामध्ये अडकलेली पिढी नशेच्या विळख्यातून बाहेर यावी यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. या जनजागृतीमुळे व्यसनाधीनता कमी होऊन नशामुक्त समाज घडेल, असा विश्वास पोलीस उपनिरीक्षक नितिन मंडलिक यांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड पोलीस ठाणेंतर्गत नशामुक्त भारत रॅली कार्यक्रमावेळी आपले मत व्यक्त केले.

नशा करू नका, नशेत गाडी चालवू नका, आपला जीव लाख मोलाचा, कुटुंबाला सांभाळा अशी पत्रके व स्टिकर नागरिकांना व रिक्षाचालकांना वाटप करण्यात आले.

या वेळी पोलीस नाईक परेश म्हात्रे, सुरेश वाघमारे, शिपाई सागर रसाळ, रिक्षा चालक-मालक संघटनाचे अध्यक्ष मुजाफर सुर्वे, वाहतूक पोलीस हवालदार संतोष गायकवाड, माजी अध्यक्ष रिक्षा चालक -मालक संघटना असलम शेख, सारिक सुर्वे, मुकेश दांडेकर, इम्रान काजी आदींसह होमगार्ड व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.





**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000027615** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-33/ 2023-2024. RFx Re-E-Tender for Work of Strength Evaluation Survey (Structure Stability) of Tower Pile Foundation from Loc No. 666 to 670 in CBD Belapur Creek Area of 220KV TSS – Kharghar – Topworth D/C Line under EHV under EHV Lines S/Dn., Panvel under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount**: Rs. 1,84,729/- **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 05.07.2023, 18:00 Hrs to 12.07.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 12.07.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 13.07.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**


## सरखेल कान्होजी आंग्रे यांना नौदल, तटरक्षक दल, रायगड पोलिसांची मानवंदना

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या २९४व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी (दि. ४) नौदल, तटरक्षक दल, रायगड पोलिसांची मानवंदना देण्यात आली. या वेळी दुचाकी रॅलीदेखील काढण्यात आली.

कान्होजी आंग्रे यांच्या अलिबाग येथील समाधी येथे मंगळवारी अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गाज फाउंडेशन आणि नगर परिषदेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भारतीय नौदलाचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा यांनी कान्होजी आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. रायगड पोलीस दलातर्फेदेखील कान्होजी आंग्रे यांना मानवंदना देण्यात आली.

या वेळी भारतीय तटरक्षक दलाचे कमांडर प्रशांत गोजरे, सहायक कमांडर अमोलकुमार मुसळे, कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे, जिल्हाधिकारी योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अलिबाग नगरपालिकेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, माजी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनीही सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समाधीसमोर नतमस्तक होत अभिवादन केले. माजी नगरसेवक प्रदीप नाईक, संजना कीर, नगरपालिकेचे कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कमोडोर आदित्य हाडा यांनी यावेळी आंग्रे समाधी परिसराची माहिती करून घेतली. समाधीस्थळ परिसराच्या सुशोभिकरणाबाबत या वेळी चर्चा झाली. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.






### सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय

शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, कामत आळी, सतक्रार प्रेस समोर, ता. अलिबाग, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ईमेल ddr-rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार गोल्डन ड्रीम आर्केड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. जि. रायगड यांनी गैरअर्जदार १) फिरोज युसुफअली मुन्शी २) रेश्मा फिरोज मुन्शी ३) श्री रिझवान फिरोज मुन्शी ४) रेहनुमा फिरोज मुन्शी ५) फरहा फिरोज मुन्शी वरील सर्व रा.रुम नं.१, पहिला मजला मिठाईवाला बिल्डींग, ३८ खोका बाजार, महमंद अली रोड, मुंबई ४०००१४ क्र. १ ते ५ यांचे कुलमुखत्यारधारक श्री. मोहमद अरीफ शफीक अहमद पटेल, रा. पटेल मोहल्ला, ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६, ६) मेसर्स सलाम ग्रुप तर्फे भागीदार कार्यालय-२०५/७१ मधुस्मिता, प्लॉट नं. १२१, एम.टी.एन.एल. बिल्डींग. पनवेल जि. रायगड, ७) श्री. इस्तीयाक अहमद शफिक अहमद पटेल, रा. दुसरा मजला, मुकी मंजील, भुसार मोहल्ला, पनवेल ता. पनवेल जि. रायगड, ८) श्री. अब्दुल आहद अब्दुलरशिद मुल्ला (मयत) यांचे वारस रा. पिस रेसिडेन्सी, पाचवा मजला, बंदर रोड, पनवेल जि. रायगड ८.१ श्रीम शाहिदा अब्दुल आहद मुल्ला ८.२ श्री अब्दुल बार अब्दुल आहद मुल्ला ८.३ अफिया अब्दुल आहद मुल्ला ८.४ अमारा अब्दुल आहद मुल्ला ८.१ ते ८.४ सर्व रा. सी.टी.एस. नं. ५१/अे २, वाझी मोहल्ला, कोळेश्वर शाळेजळ, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. ९) श्री. मोहमद आय्युब हसनमीया पटेल, रा. मुमताज अपार्टमेंट, पहिला मजला, भुसार मोहल्ला, पनवेल जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम चे कलम ११ अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**अंतिम भूखंड क्र. २२९ ओ, १२०८ चौ. मी. यावरील मिळकत मौजे पनवेल, गाडगीळ ज्वेलर्स समोर, एम.टी. एन.एल, बिल्डींगजवळ ता. पनवेल. जि. रायगड**

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ६ व ८ यांना नोटीस बजावणी होत नसलेमुळे पेपर नोटीस करणेबाबत अर्ज दाखल केला तो मान्य केला असून अर्जदार व गैरअर्जदार यांचे सहमतीने दिनांक १२/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे. तसेच वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १२/०७/२०२२ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे अन्य कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २७.०६.२०२३

शिक्का

**सही/-**
**( प्रमोद जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**


## संपर्काने संघकार्य वाढीस लागेल -डॉ. प्रमोद मनोहर

**पेण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य हे एकमेकांच्या संपर्कानेच वाढेल असे प्रतिपादन आरोग्य भारतीचे जिल्हा प्रमुख डॉ. श्रीराम मनोहर यांनी पेण येथील राष्ट्रीय हितसंवर्धक मंडळाच्या आयोजित गुरुपूजनाच्या उत्सवात केले.

डॉ. मनोहर पुढे म्हणाले की, समर्पण हे धनाचेच असते असे नाही, आपण समाजासाठी व संघासाठी दिलेला वेळ, आपल्या परंपरा जपणे हिंदू राष्ट्र उभारण्यासाठी कार्य करणे अशी अनेक कामे समर्पणात येतात. हे त्यांनी विविध दाखले देऊन विशद केले. या उत्सवास डॉ. अशोक भोईर, अतुल वैद्य, उद्योजक नानजी भानुशाली, उपेंद्र जोशी, दीपक पाटील, अविनाश राणे आदी मान्यवरांसह संघ स्वयंसेवक उपस्थित होते.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000027658** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-34/2023-2024. RFx Re-E-Tender for AMC for Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220kV Taloja, Uran and ONGC Panvel Substation under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 23,00,000/- **EMD Amount:** Rs. 23,000/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 05.07.2023, 18:00 Hrs to 12.07.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 12.07.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 13.07.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**



### पनवेल महानगरपालिका

**ता, पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१० २०६**
**वाहन विभाग**

अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल यांचेमार्फत खालील नमूद केलेल्या कामाकरीता दिनांक ०५/०७ / २०२३ रोजीपासून दिनांक ११/०७/२०२३ रोजीपर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत बंद लिफाफा पध्दतीने जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| कामाचे नाव | कामाचा कालावधी | दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| पनवेल महानगरपालिका मालकीच्या वाहनांची विमा पॉलिसी, फिटनेस, पी.यु.सी. इ. माहिती अद्ययावत ठेवणेकामी संगणकीय प्रणाली (Software) सर्व्हर सहित तयार करणे. | ०३ वर्षे | |

सदर निविदेची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दिनांक ११/०७/२०२३ रोजीपर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

जाहिरात क्र. पमपा/ वाहन/९९-२३/प्र.क्र २८/ जा.क्र. १३६/२०२३
दिनांक ०४/०७/२०२३

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## निवडक



### शैक्षणिक साहित्य वाटप व अन्नदान

**उरण :** कै. कू. अमित रामकृष्ण पालकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून दुर्वा अमोघ पालकर आणि बिग बॉस ग्रुप वेश्वी यांच्यातर्फे रा. जि. प. प्रा. शाळा वेश्वि येथे १५० विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.तसेच वेश्वि कातकरीवाडी येथील विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले. सायंकाळी पनवेल तालुक्यातील करुणेश्वर वृध्दाश्रम भानघर येथे अन्नदान करण्यात आले. अमोघ पालकर, कैलास पालकर, महेश पालकर, शरद पालकर तसेच बिग बॉस ग्रुपचे अक्षय पाटील, स्नेहल पालकर, नितेश मुंबईकर, कल्पेश पाटील, राकेश पाटील, सुमित पाटील, प्रणित कडू, विपुल मढवी, रोशन पाटील, परम पाटील, अतुल पाटील, तेजस पाटील, वैभव पालकर आदी उपस्थित होते.

### नवनियुक्त सतीश निकम यांचे स्वागत

**उरण :** पोलीस ठाण्यामध्ये नव्यानेच पदभार स्विकारलेले वरिष्ठ निरीक्षक सतिश निकम यांचे वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. या वेळी विविध विषयावर पदाधिकारी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. उरण तालुका वंचित बहुजन आघाडी अध्यक्ष तुकाराम खंडागळे, भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष अमोल शेजवळ, शहर प्रमुख मुजमील तुर्गेकर, उरण संस्कार उपाध्यक्ष सदानंद सकपाळ व इतर कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



### आयएएस अधिकाऱ्यांचा सत्कार

**नवी मुंबई :** नेरूळमधील भिमाशंकर सोसायटीतील अक्षता बँक्वेट हॉल मध्ये नवनियुक्त आयएएस अधिकारी श्रीधर डुबे पाटील, मनोज रानडे, मकरंद देशमुख या तीन आएएस अधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ झाला. या वेळी माजी नगरसेवक तथा सभागृह नेता रवींद्र इथापे, सुरेश जाधव, डी.टी.शिंदे, पी.के.सिन्हा, संजय निकम, एस.एम.यादव, सुनील चव्हाण, दिगंबर रौंधळ, सुरेश सारंगकर, श्रीराम यादव, दिलीप गुट्टे, बाबासाहेब राजळे, माजी नगरसेविका सुरेखा इथापे, मनिषा दुबे–पाटील आदी उपस्थित होते.



# खोदलेले पदपथ 'जैसे थे'

## संबंधित ठेकेदार, अधिकारांनी लक्ष द्यावे; नागरिकांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील चौकांचे काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. बहुतांश चौकाचे काम पूर्ण झाले आहे, मात्र उर्वरित चौकांचे काम पावसाळा सुरु झाल्याने जैसे थे स्थितीत ठेवण्यात आले असल्याचे आढळून येत आहे. अपूर्ण आणि अर्धवट स्थितीत ठेवण्यात आलेल्या कामाच्या ठिकाणी संबंधित ठेकेदाराने सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीच काळजी घेतली नसल्याचे पहावयास मिळत आहे.

कामाच्या ठिकाणी सूचना फलकांचा तपशील नाही तर कामाच्या ठिकाणी धोका असलेले फलक आणि बेरीअर लावण्यात आलेले नाहीत तर बहुतेक ठिकाणी माती आणि दगड आदी पासून बचाव होण्यापासून लावण्यात येत असलेले हिरवी नेटिंग नसल्याचे आढळून आले आहे. संबंधित ठेकेदारांनी दुर्लक्ष केले असून ठेकेदारावर लक्ष् ठेवणारे मनपाचे संबंधित अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील चौकांमध्ये होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी चौकासभोवतालचे रस्ते काँक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आली असून ही कामे शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या निर्देशानुसार पावसाळा कालावधीपूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे, मात्र सध्या शहरातील एकूण ८८ चौका पैकी अर्धवट स्थितीत असलेल्या उर्वरित चौकांचे काम पावसाळा कालावधीच्या अनुषंगाने थांबविण्यात आले आहे, मात्र पावसाळापूर्व जी कामे संबंधित ठेकेदारांनी अर्धवट ठेवली आहेत त्याची सामान्य नागरिकांना रहदारीसाठी तसेच वाहतुकीसाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची दक्षता घेतली जात नसल्याचे दिसून येत आहे.

सानपाडा सेक्टर पाच येथील चौक, जुईनगर सेक्टर २५ मधील गावदेवी मैदानाच्या जवळील माता अमृतानंदमयी शाळेच्या बाजूला असणारे गटार धोकादायक स्थितीत असून ते नागरिकांच्या जीवावर बेतू शकते.



> **तक्रार निवारणासाठी संपर्क करण्याचे आवाहन**
>
> नवी मुंबई शहर खड्डेमुक्त रस्ते आणि चौक ही संकल्पना नजरेसमोर ठेवून मागील दहा वर्षापासून नवी मुंबई महापालिकेने याकडे विशेष लक्ष दिले आहे. यादृष्टीने कुठेही खड्डा आढळल्यास तो त्वरित दुरुस्त करण्यासाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कंत्राट कार्यान्वित केले आहे. ही बाब तक्रार निवारण प्रणालीशी संलग्न करण्यात आली असून ८४२४९४८८८८ हा व्हॉट्सअॅप क्रमांक नागरिक संपर्कासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

> **नवी मुंबई महापालिकेचे काम करत असलेल्या संबंधित ठेकेदाराने महापालिकेच्या नियम व अटींचे पालन करणे बंधनकारक आहे. महापालिकेचे उपअभियंता यांचे कामाकडे लक्ष असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने कामात हलगर्जीपणा केल्यास वा सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्या नसल्याचे आढळल्यास संबंधित ठेकेदारास नोटीस देऊन पुढील कारवाई केली जाते.**
>
> **–संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका**

शाळा सुरू झालेल्या आहेत पालक आणि विद्यार्थी यांची गर्दी मार्गावरून सतत होत असते. रात्रीच्या वेळी एखाद्या व्यक्ति गटार खोदकाम केलेल्या ठिकाणी पडून त्यास मोठी दुखापत होऊ शकते.

सध्या शाळा सुरु असल्यामुळे कामाच्या ठिकाणीच मुलांची वर्दळ असते त्यात खोदलेले रस्ते फुटपाथ यामुळे गर्दीमध्ये जास्तच भर पडते अनेक वेळा तर एक सिग्नल सोडून दुसरा सिग्नल येई पर्यंत निम्मिच वाहने बाहेर सिग्नल पार करून जातात अनेक वाहने सिग्नल लागलेला असतानाही तशाच गाड्या पुढे नेतात परिणामी रस्ता बंद होऊन वाहतूक कोंडी वाढत आहे. संध्याकाळी तर जुईनगर सेक्टर २४ २५ नेरुळ स्टेशन समोर वाहनांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. पावसाळ्याला सुरुवात होऊन २० दिवस झाले तरी देखील रस्ते फूटपात वरील खोदकामे आहे त्या परिस्थितीत असल्याने जोराच्या पावसाने खोदकाम करून त्याच ठिकाणी पडलेली माती पुन्हा खोदकाम केलेल्या जागी वाहून जात पुन्हा पाणी तुंबून पूरस्थिती निर्माण होऊ शकते याला जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित केला आहे.

## तुपगाव येथील वानरांचा ग्रामपंचायतीकडून बंदोबस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघातील ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव हद्दीतील ब्राम्हण आळी येथील वानरांचा बंदोबस्त करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून ब्राम्हण आळी येथे वानरांचा उद्रेक झाला होता. या वानरांमुळे सर्वांना त्रास होत होता. ही बाब ग्रामस्थांनी सरपंच रवींद्र कुंभार आणि उपसरपंच सुयोग भालेकर यांच्या लक्षात आणून दिली. या गोष्टीचा आढावा घेत लगेच या वानरांना पकडण्यासाठी रविवारी (दि. २) टीम बोलावण्यात आली व या वानरांना सुरक्षितपणे रेस्क्यू करून कर्नाळा पक्षी अभयारण्यात सोडून देण्यात आले.



टीम वानर पकडत असताना या गोष्टीचा पाठपुरावा घेण्यासाठी सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, सदस्य सचिन साखरे व स्वाती जाधव हे उपस्थित होते.

ग्रामस्थांनी केलेल्या मागणीवर लगेच अंमलबजावणी केल्याबद्दल ग्रामस्थांनी सरपंच, उपसरपंच व सदस्यांचे आभार मानले व सुटकेचा निःश्वास सोडला.

## सानपाड्यात नागरिकांना अन्नदान



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना सानपाडा विभागातर्फे आषाढी एकादशीच्या निमित्ताने सानपाड्यातील तमाम नागरिकांसाठी तसेच भक्तांसाठी, वारकऱ्यांसाठी उपवास खिचडी वाटप करण्यात आलेले आहे. जुईनगर स्टेशन डी मार्टजवळ, पारसिक जनता बँक सेक्टर ५ गोल्डन पॅलेस हॉटेलजवळ, रॉयल फूड समोर सानपाडा स्टेशन समोरील रस्ता येथे अनेक भाविकांना अन्नदान करण्यात आले.

या वेळी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विसाजी लोके, गणेश पावगे, सूर्यकांत झेंडे, विकास गाढवे, केदार तेंडुलकर, भावेश पाटील, देवेंद्र चोरघे, मनोज भोईर ,अविनाश जाधव, शुभम भालेराव, ओमी राणा, समीर भोईर, सुरेखाताई गव्हाणे आदींनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून उपजिल्हाप्रमुख अजित सावंत यांनी सर्व सानपाडा वासियांना आवाहन केले होते, त्यांच्या ह्या आवाहनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

## स्वामी समर्थ मठात गुरूपौर्णिमा



**पनवेल : वार्ताहर**

गुरुपरंपरा असणारा पनवेल मधील एकमेव मठ गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे दरवर्षीप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमाद्वारे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

श्री स्वामी समर्थ मंदिर (मठ) गावदेवीपाडा येथे गुरुपुर्णिमेनिमित्त आज पहाटे ५ वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये काकड आरती, पोथी वाचन, श्रवणीय प्रवचन, श्री स्वामी समर्थ महिला भजन मंडळ यांचे भजन आदी कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत झाला. यानिमित्त असंख्य भाविकांनी मठात भेट देत स्वामींचे दर्शन घेतले.

गुरुपौर्णिमेनिमित्त शहरातील महात्मा फुले आगरी समाज हॉल येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ शेकडो भक्तांनी घेतला. या वेळी मठाधीपती सुधाकर घरत (भाऊ), अवधुत सुधाकर, घरत व श्री स्वामी समर्थ भक्त मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## श्री साई नारायणबाबा आश्रमात गुरूपौर्णिमा उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

सद्‌गुरु श्री साई नारायणबाबा यांच्या आध्यात्मिक उपस्थितीत सोमवारी पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साई नारायण बाबा आश्रमात श्रीगुरु पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने साई नारायणबाबा आश्रमात धार्मिक कार्यक्रमांसह गरीब मुलांना मोफत दूध आणि अन्न वाटप करण्यात आले.

पनवेलसह रायगड नवी मुंबईमधील लाखो साई भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री साई नारायणबाबा आश्रम येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सकाळपासून आश्रमात श्री व्यास पूजन व महायज्ञ, परम गुरुजींच्या पावन चरण पादुकेचा महाअभिषेक त्याचप्रमाणे वेदमंत्र साधना, यज्ञोपवीत धरणं, श्री महामंत्रोपदेश, गुरुपौर्णिमेच्या महत्वावर प्रवचन, महा श्री चरण पूजा असे धार्मिक कार्यक्रम झाले. तसेच गरीब मुलांना मोफत दूध आणि अन्न वाटप असे सामाजिक उपक्रम झाले.



आश्रमात दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, राम थडानी, डॉ शकुंतला भटिजा यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरूपौर्णिमेनिमित्त ज्येष्ठ नटवर्य वसंत चिर्लेकर यांचा सन्मान

**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नटवर्य तथा ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांच्या चिरनेर भोम येथील निवासस्थानी गुरूपौर्णिमेनिमित्त चरणस्पर्श आशीर्वाद घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उरण तालुक्यातील चिरनेर येथील गुरुवर्य तथा नटवर्य वसंत चिर्लेकर यांचे चरणस्पर्श करीत, नाट्य कलाकारांनी आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला अष्टगंध कलामंचाचे नाटककार हासुराम पाटील, जय भवानी थिएटर्सचे नाटककार धनेश्वर म्हात्रे, नाट्य कलावंत दत्तात्रेय म्हात्रे, रंगकर्मी गोवर्धन पाटील, प्रा. दिलीप ठाकूर तसेच अन्य नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम सोमवारी नाट्यमय वातावरणात रंगला होता.



या वेळी ७७ वर्षाचे गुरुवर्य तथा नटवर्य वसंत चिर्लेकर यांनाही नाटकातील संवाद सादर करण्याचा मोह आवरता आला नाही. या वेळी त्यांनी अनेक ऐतिहासिक नाटकातील संवाद उत्स्फूर्तपणे सादर करून उपस्थित नाट्य कलाकारांना मंत्रमुग्ध केले.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली जांभिवली गाव, आदिवासी वाडी तसेच कराडे बुद्रुक व घेरा माणिकगड या प्राथमिक शाळांमध्ये वह्या वाटपाचा कार्यक्रम मंगळवारी (दि. ४) झाला.

या कार्यक्रमाला भाजप तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, जांभिवली ग्रामपंचायत सरपंच रिया रवींद्र कोंडीलकर, उपसरपंच अनिता अनंता कोंडीलकर, सदस्य शेखर धर्मराज जाधव, अमित गोविंद कोंडीलकर, शाळा अध्यक्ष शिल्पा भरत कोंडीलकर, उपाध्यक्ष समीर अनंत कोंडीलकर, महेश रघुनाथ टकले, बूथ अध्यक्ष संदीप गोडीवले, ज्ञानेश्वर पुंडलिक कोंडीलकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.















**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मंगळवारी तालुक्यातील नेरे हायस्कूल नेरे भागशाळा, कोप्रोली रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विहीघर हायस्कूल, केवाळे रायगड जिल्हा परिषद शाळा, एसईएस माध्यमिक विद्यालय आणि काळुंद्रे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.**




## निवडक

### संस्कारधाम शाळेत गुरूपौर्णिमा उत्साहात



**महाड** : संस्कारधाम माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. ३) गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. प्राचार्य भारती कदम यांनी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन व सरस्वतीचे पूजन केले, तसेच इ. आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे स्वागत पुष्पवृष्टीने करून सर्वांना ओवाळले व आशीर्वाद घेऊन भेटवस्तू दिल्या. या वेळी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत इ. नववीतील भक्ती चौधरी प्रथम, आठवीतील नागदे अन्वेष द्वितीय, नववीतील गायकवाड पूजा तृतीय यांनी पटकाविला. कार्यक्रमाची तयारी इ. नववीतील विद्यार्थी व दिलीप सकपाळ यांनी केली. या कार्यक्रमाला नितीन ढेपे, नैना परब, सायली बनकर, सुशील पार्टी, राम काळे हे उपस्थित होते.

### पाचघर शाळेत येथे वृक्षारोपण



**माणगाव** : राजिप पाचघर शाळेत पर्यावरण जतन व संवर्धन करण्यासाठी मंगळवारी (दि. ४) वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी पर्यावरण जतन व संवर्धनाचा संदेश देण्यात आला. लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती पाचघरचे सदस्य, शिक्षक जगदिश हिरू कासे, शिक्षिका लता प्रभाकर बेंद्रे, महिला मंडळ अध्यक्ष राधिका बाळाराम भेलोसे उपस्थित होते.

### 'गॅलेक्सी'तर्फे पत्रकारांना रेनकोट




**पेण** : सामाजिक जीवनात पत्रकारांना अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागतो. खेडोपाडी, वाड्यावस्त्यांवर जाऊन बातमी बनविण्याचे काम पत्रकार करीत असतात, अन्यायाला वाचा फोडून दीनदुबळ्यांना न्याय मिळवून देण्याच काम त्यांच्याकडून होत असते. त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने गुरूपौर्णिमेनिमित्त गॅलक्सी हॉस्पिटलतर्फे पत्रकारांना सोमवारी (दि. ३) रेनकोट वाटप करण्यात आले. या वेळी डॉ. किशोर देशमुख, डॉ. रत्नदीप गवळी, ज्येष्ठ पत्रकार विजय मोकल, राजेश टेलर, डॉ. किशोर देशमुख, डॉ. नयन ब्रह्मे, डॉ. सुनील कांबळे, पत्रकार कमलेश ठाकूर, दत्ता म्हात्रे, अनिस मनियार, नरेश पवार आर्दीसह हॉस्पिटल कर्मचारी उपस्थित होते.

### एम. बी. मोरे संकुलात गुरूपौर्णिमा

**रोहे** : एम. बी. मोरे फाउंडेशनच्या शिक्षण संकुलात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिला महाविद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एनएनएसच्या विद्यार्थिनींनी सर्व शिक्षकांना अभिवादन करून गीत, श्लोक तसेच काहींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या काटम हिने केले. दुपारी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम संस्थेचे संचालक अशोकराव मोरे यांच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षक स्नेहल कसबले व रोहन पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक तसेच कविता सादर केली. कार्यक्रमांचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, एनएनएसचे विभाग प्रमुख प्रा. मयुर पाखर आणि मुख्याध्यापिका नंदिनी जोशी यांनी केले.

# खालापुरात कृषी खाते ॲक्शन मोडवर

## ■ अधिकाऱ्यांनी घेतला आढावा; शेतकऱ्यांना दिला योजनांचा लाभ



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

कृषि विभाग खालापूरच्या वतीने उपविभागीय कृषि अधिकारी नितीन फुलसुंदर यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. या योजनांची प्रत्यक्ष स्टॉलवर व शेतावर जाऊन कार्यान्वित योजनांची अंमलबजावणी व माहिती जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी करून घेतली व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी उज्ज्वला बाणखेले, उपविभागीय कृषि अधिकारी खोपोली नितीन फुलसुंदर व तालुका कृषि अधिकारी सुनील निंबाळकर यांनी राबवलेल्या विविध योजनांची पाहणी केली. अष्टविनायक महड येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये लाभ घेतलेल्या करुणा गायकवाड, सुनील गायकवाड यांच्या करुणा चपाती सेंटर येथे भेट दिली. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेतून ६.५० रु. च्या प्रोजेक्टला ३५ टक्के अनुदान मिळाले आहे, तसेच सध्या एक हजार नग हाफ बेक चपाती तयार करून विक्री करीत होत असलेल्या स्टॉलला भेट दिली व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग या योजनेतून ब्रॅण्डिंग, पॅकिंग व विक्री व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर मौजे मोरबे येथील दशरथ कदम, शरद कदम यांच्या शेतातील नावीन्यपूर्ण बाबी अंतर्गत ड्रॅगन फ्रुट या लागवडीची पाहणी केली. जिल्हा कृषि अधिकारी बाणखेले यांनी भाजीपाला लागवड व कडधान्य लागवड आंतरपिक घेण्याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

उपविभागीय कृषि अधिकारी खोपोली नितीन फुलसुंदर यांनी लागवडीचे क्षेत्र उताराला असल्याकारणाने जमिनीची धूप कमी करण्याबाबतच्या उपाययोजना सूचवल्या. स्मार्ट प्रकल्पांतर्गत पूर्णत्वास आलेले सुखकर्ता ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी कोपरी लोहप येथील केळी रायपनिंग चेंबरला भेट दिली. सुखकर्ता ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनीचे चेअरमन सुभाष मुंढे यांनी प्रकल्पाबद्दल सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांच्या माहितीबाबत उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकरी मुंढे यांचे कौतुक केले. बाणखेले यांनी केळी लागवड व विक्री व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले व फुलसुंदर यांनी केळी एक्सपोर्ट करण्याविषयी मार्गदर्शन केले. या वेळी तत्कालीन तालुका कृषि अधिकारी अर्चना सूळ उपस्थित होत्या.

भेटीचे पूर्ण नियोजन मंडळ कृषि अधिकारी खालापूर जे. के. देशमुख, कृषि पर्यवेक्षक धुमाळ व महाडिक, कृषि सहाय्यक नितीन रानजुण, अजित फराटे व बीटीएम प्रज्ञा पाटील यांनी केले.

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी नांदगाव हायस्कूलचे प्रयत्न



**मुरूड : प्रतिनिधी**

शासनाच्या आदेशानुसार आदिवासी समाजातील मुलांनाही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य विद्यार्थी शोधून त्यांच्या पालकांना भेटून शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी नांदगाव हायस्कूल येथील शिक्षक आदिवासी वाडी व अन्य ठिकाणी भेट देत आहेत.

आदिवासी समाज हा कष्टकरी असून जेथे काम मिळेल तिथे स्थलांतर करीत असतो. पोटाची खळगी बुजविण्यासाठी कामाला अधिक महत्त्व तर शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत असतो. आदिवासी समाजातील मुले नांदगाव हायस्कूल येथे शिक्षण घेण्यासाठी यावी यासाठी या हायस्कूलचे शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर व होमगार्ड सार्थक शेडगे यांनी अदाड येथील मनेरपाडा येथील आदिवासीवाडीत भेट देऊन पालकांचे मतपरिवर्तन करून आपल्या मुलांना शाळेत पाठवण्याचे आवाहन केले.

शाळेत मुले आल्यावर त्यांना पुस्तके, वह्या व अन्य मदतही करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यांच्या या भेटीचा परिणाम होऊन येथील सहा आदिवासी मुले आता शाळेत येऊ लागली आहेत.

**शाळेच्या परिसरात अनेक आदिवासीपाडे आहेत. त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नांदगाव हायस्कूलचे चेअरमन फैरोज घलटे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम आखण्यात आली आहे. यासाठी मुख्यच्यापक श्रीधर ओव्हाळ व शिक्षक अशी मुले शाळेत आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.**

**–महेश वाडकर, शिक्षक प्रतिनिधी**

## मातीचा भराव केल्याने स्वयंभू मूर्ती पाण्याखाली



**चौक : प्रतिनिधी**

चौक गावचे ग्रामदैवत असलेल्या गावदेवी मंदिराच्या परिसरात माती भराव केल्याने मंदिराच्या स्वयंभू मूर्ती पाण्याखाली गेल्या आहेत.

चौक गावचे ग्रामदैवत असलेल्या गावदेवी मंदिराच्या परिसरात रेल्वेट्रॅकसाठी, तसेच परिसरात खाजगी मालकांनी आपल्या व्यावसायिक कामासाठी आपल्या जागेत केलेला माती भराव यामुळे स्वयंभू असलेले मंदिरातील व मंदिराबाहेरील मूर्ती पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने भाविकांच्यात नाराजी निर्माण झाली आहे. पनवेल–कर्जत हा रेल्वेट्रॅक प्रस्तावित झाला असून, त्याचा एक भाग पूर्ण झाला आहे. दुसऱ्या ट्रॅकचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. सध्या परिसरात साचणारे पाणी काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यातची मागणी होत आहे.

## कर्जतमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान




**कर्जत : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी दहावी आणि बारावीच्या टप्प्यातच आपले करिअर निश्चित करावे आणि त्यावेळी करिअरला टाईमपास समजू नये. पुढच्या ध्येयाबाबत निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करण्यासाठी वेळ घालवू नका. मुलांनी स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या परीक्षा द्यावी आणि नोकऱ्यांच्या संधी प्राप्त कराव्यात, असे आवाहन संबोधी यांनी केले.

कर्जत नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेश गायकवाड यांच्या माध्यमातून गुंडगे येथील गुड शेफर्ड विद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. या वेळी ज्येष्ठ कार्यकर्ते सीताराम कांगणे, माजी उपनगराध्यक्ष वसंत सुर्वे, उत्तम जाधव, नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, भारती पालकर, पुष्पा दगडे, माजी नगरसेवक संतोष पाटील, सुरेश गायकवाड, माजी सरपंच जगदीश ठाकरे, सुनील गायकवाड, माजी शिक्षण विस्तार अधिकारी खैरे, शिक्षण विभागाचे सुर्वे इतर मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात माऊंट एव्हरेस्ट वीर संतोष दगडे, राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झालेल्या नेहा आढाव, ॲड. भावना पवार, डॉ. नेहा यादव तसेच कर्जत शहरातील दहावी आणि बारावीमधील पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. गुंडगे भागातील रस्त्यांवर आणि दुभाजकांमध्ये झाडे लावून त्यांचा सांभाळ करणाऱ्या शोभा सिकेवरा, प्रभा फर्नांडीस, हिलरी फर्नांडीस, सचिन उमक, अनिल शिंदे यांचे या वेळी कौतुक करण्यात आले.

## माणगाव जॉली क्लबची बैठक उत्साहात

### विविध उपक्रम राबविण्याचा सदस्यांकडून निर्धार

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रात गेली कित्येक वर्ष संस्थापक ॲड. राजीव साबळे यांच्या नेतृत्वाखाली जॉली क्लबची बैठक रविवारी (दि. २) अशोकदादा साबळे विद्यालय येथे उत्साहात झाली.

या बैठकीत जॉली क्लबमार्फत विविध उपक्रम राबवून पुन्हा एकदा नव्या जोमाने काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला जे सदस्य उपस्थित राहू शकले नाहीत त्यांना बोलावून पुन्हा १५ जुलै रोजी एका बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले.

या बैठकीत संस्थापक ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. ७) विविध उपक्रमांनी राबविण्यात येणार असून क्लबच्या सर्व पदाधिकारी व सभासदांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ज्येष्ठ पदाधिकारी पत्रकार अरुण पवार व समाधान उतेकर यांनी केले.

या बैठकीला लोकनेते अशोकदादा साबळे प्रतिष्ठान माणगाव अध्यक्ष व जॉली क्लबचे ज्येष्ठ पदाधिकारी समाधान उतेकर, माजी स्वीकृत नगरसेवक नितीन बामगुडे, उद्योजक विरेश येरुणकर, दिपक हिरवे, डी. एम. जाधव, यासिन परदेशी, अशरफ जामदार, संदीप जाधव, उत्तम तांबे, नितीन मोरे, अनंता थळकर, रणधीर कनोजे, मंदार शेलार, राजू सुर्वे, सुवास जगे, जिंद्र जाधव, मंगेश चौधरी, बाळा खजबजे, सागर पाटील, निलेश भादवकार व सभासद उपस्थित होते.










**माणगाव : नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात आमदार आदिती तटकरे यांचा समावेश करण्यात आल्याने त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, माजी, नगरसेवक जयंत बोडेरे, हेमंत शेठ, उद्योजक नरेश राजपूत, इंदापूर विभाग राष्ट्रवादीचे युवक प्रदेश सचिव दीपक जाधव, काका नवगणे, उदय अधिकारी, मनोज जैन, सुभाष दळवी, गणेश पवार, नितीन घोणे, समीर मेहता, बाळा खातू, मेघनाथ सातपुते, निजामपूर विभागातील शरद सावंत, उणेगाव सरपंच राजेंद्र शिर्के, स्वप्नील सकपाळ, सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर सरफराज अत्तार उपस्थित होते. सर्वांनी मंत्री आदिती तटकरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)

## हेल्मेट ही सक्ती नाही, तर शक्ती –आयुब तांबोळी



**चौक, मोहोपाडा, खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

हेल्मेट वापरणे सक्तीचे समजू नका, ती एक शक्ती असल्याने तिचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

कोरोना योद्धा, सहाय्यक फौजदार कै. महेश मधुकर कळमकर यांच्या तृतीय स्मृती दिनानिमित्त दिलासा फाउंडेशन, पत्रकार आणि कळमकर कुटुंबीयांच्या वतीने खालापूर नगर पंचायतीच्या स्वच्छतादुतांना छत्रीवाटप, दुचाकीस्वारांना हेल्मेट वाटप खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आले. त्या वेळी तहसीलदार आयुब तांबोळी बोलत होते.

कार्यक्रमास उपनिरीक्षक सरला काळे, सहाय्यक निरीक्षक गणेश कराड, नगराध्यक्ष रोषना मोडवे, नगरसेवक राजेश पारठे, नगरसेवक आकेश जोशी, दिनेश फराट, महेश पवार, नगरसेविका उज्वला निधी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र शहा, पंचायत समिती खालापूर माजी उपसभापती श्याम साळवी, पत्रकार अमोल राजे पाटील, अरुण नलावडे, दिलीप पवार,, हनुमंत मोरे, अर्जुन कदम, दिपक जगताप, प्रसाद अटक, विकी भालेराव, डॉ. शेखर जांभळे, पोलीस पाटील संघटना खालापूर तालुका अनंता ठोंबरे, इनरव्हिल क्लबच्या माजी अध्यक्ष क्षमा आठवले, वैभव भोईर, पवन दिवेकर, उमेश पडवकर, निवृत्त पोलीस अधिकारी सुरेंद्र कुलकर्णी, राजेश भालेराव, संजय कचरे, चौक ग्रामपंचायत सदस्य निखिल मालुसरे, राहुल देसाई, मिलिंद पाटील, राजा पवार आदी उपस्थित होते.

# विंडीजसाठी लारा पुन्हा मैदानात

## भारताविरुद्धच्या मालिकेपूर्वी मेंटॉरपदाची जबाबदारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी विश्वचषक २०२३मधून बाहेर पडल्यानंतर वेस्ट इंडिजचा संघ घरच्या मैदानावर भारतासोबत भिडणार आहे. १२ जुलैपासून दोन्ही संघांमधील दोन कसोटी सामन्यांची मालिका सुरू होत आहे. या दौऱ्यात भारतीय संघ कसोटीशिवाय तीन एकदिवसीय आणि पाच सामन्यांची टी-२० मालिकाही खेळणार आहे. विश्वचषक फेरीतून वेस्ट इंडिज संघ बाहेर पडल्यानंतर आता माजी दिग्गज ब्रायन लारा याला संघात बोलावणे धाडले आहे.



ब्रायन लारा कॅरेबियन संघाचा परफॉर्मन्स मेंटॉर म्हणून काम पाहणार आहे. अलीकडच्या काळातील वेस्ट इंडिजची कामगिरी अतिशय लाजिरवाणी झाली आहे. दोन वेळा चॅम्पियन असूनही वेस्ट इंडिज वनडे विश्वचषकाचा भाग नसण्याची ४८ वर्षांतील ही पहिलीच वेळ आहे. अशा परिस्थितीत लारा संघात आल्यानंतर त्यांच्या कामगिरीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.

ब्रायन लारा हा त्याच्या काळातील महान फलंदाज होता. तो वेस्ट इंडिजसाठी १३१ कसोटी आणि २९९ एकदिवसीय सामने खेळला. कसोटी क्रिकेटमध्ये लाराने ५२.८८च्या सरासरीने ११,९५३ धावा केल्या आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याने ३४ शतके आणि ४८ अर्धशतकांची नोंद केली आहे. लाराची कसोटीतील सर्वोत्तम धावसंख्या ४०० धावा आहे. हा विक्रम आजही त्याच्याच नावावर आहे. त्याचबरोबर त्याने वनडेमध्ये १०,४०५ धावा केल्या. वनडे फॉरमॅटमध्ये लाराने ४०.४८च्या सरासरीने १९ शतके आणि ६३ अर्धशतके झळकावली आहेत. अशा स्थितीत सध्या वेस्ट इंडिज संघाला लाराची साथ म्हणजे निश्चितच मोठी मदत होईल.

### फोटो व्हायरल

सोशल मीडियावर एक फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या फोटोत ब्रायन लारा वेस्ट इंडिज टीमसोबत दिसत आहे. नुकत्याच झिम्बाब्वेमध्ये झालेल्या विश्वचषक पात्रता सामन्यादरम्यान वेस्ट इंडिजचा संघ स्कॉटलंडविरुद्ध पराभूत होऊन पात्रता फेरीपासून वंचित राहिला. २०२३मध्ये वेस्ट इंडिजचा मुख्य विश्वचषकात सहभाग नसेल. अशा स्थितीत लाराची सध्याच्या वेस्ट इंडिज संघाशी असलेली साथ निश्चितच मोठी मदत होईल. लारा आता उद्ध्वस्त झालेल्या वेस्ट इंडिज संघाला संजीवनी देण्याचे काम करेल.




## जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

# मनीष, पृथ्वेश, वैदेही चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेलमध्ये झाली. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

रसायनीतील मिस्तु केम प्लास्ट लि.चे व्यवस्थापकीय संचालक संजय डेढिया आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ याच्या संयुक्त विद्यमाने ही टेबल टेनिस स्पर्धा नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात रंगली. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे बक्षीस वितरण मिस्तु केम प्लास्ट लि.चे जनरल मॅनेजर एचआर आणि ॲडमिन किशोर शेळके आणि मॅनेजर गोपीचंद पाल यांच्या हस्ते झाले. या वेळी सिंधुदुर्ग जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष विष्णू कोरगावकर, सचिव हेमंत वालकर उपस्थित होते. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी. आर. साळसकर व पराग अंकोलेकर यांनी काम पाहिले.

### गटनिहाय पदकविजेते

नवोदित : मुली-रिया ठाकूर नवी मुंबई सुवर्ण, अनुष्का धामणकर नवी मुंबई रौप्य, श्रेया जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल व आराध्या धेंडे नवी मुंबई कांस्य, मुले-यश थाटे नवी मुंबई सुवर्ण, श्लोक पाटील सीकेटी स्कूल नवीन पनवेल रौप्य, आयांश जैन नवी मुंबई व समर्थ कुटे नवी मुंबई कांस्य; ११ वर्षाखालील : मुली-त्रिशा शेखर पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल सुवर्ण, आराध्या धेंडे नवी मुंबई रौप्य, मुले-नन्वीर सिंग नवी मुंबई सुवर्ण, अद्वीत गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ रौप्य; १३ वर्षाखालील : मुली-आर्या दिघे मालवण जि. सिंधुदुर्ग सुवर्ण, अनन्या अजित मराठे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल रौप्य, मुले-रेयांश शाहू नवी मुंबई सुवर्ण, कार्तिक ठाकरे नवी मुंबई रौप्य; १५ वर्षाखालील : मुली-वैदेही ठाकरे नवी मुंबई सुवर्ण, किशीका धांडे डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर रौप्य,मुले-हर्षद अनिल कुदाळे सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल सुवर्ण, रेयांश शाहू नवी मुंबई रौप्य; १७ वर्षाखालील : मुली- वैदेही ठाकरे नवी मुंबई सुवर्ण, किशीका धांडे डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर रौप्य; मुले-इशांत वेंगुर्लेकर मालवण जि. सिंधुदुर्ग सुवर्ण, हर्ष खत्री पेण रौप्य; १९ वर्षाखालील : मुले-अनिशा अमरिश पात्रा डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर सुवर्ण, विवेक पाल नवी मुंबई रौप्य; पुरुष एकेरी पृथ्वेश मंडले नवीन पनवेल सुवर्ण, मैत्रेय रौप्य; पुरुष दुहेरी : पृथ्वेश मंडले व रिषब साळसकर नवीन पनवेल सुवर्ण, मनीश सकलानी व सर्वेश दहीबावकर नवी मुंबई रौप्य; वरिष्ठ गट पुरुष : मनीश सकलानी नवी मुंबई सुवर्ण, पॉल डिमेलो नवी मुंबई रौप्य.

## सुवर्णपदक विजेता दिनेश पवार मायदेशी परतला; महडमध्ये स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

हाँगकॉग येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग आणि बेंच प्रेस स्पर्धा झाली असून या स्पर्धेत खालापूर तालुक्यातील महड येथील दिनेश पवार या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करून एशियन गोल्ड मेडल पटकावले. त्याचे गावात जंगी स्वागत करण्यात आले.

या स्पर्धेत विविध देशातील खेळाडूंनी सहभाग घेत आपला खेळ प्रदर्शित केला. यामध्ये ७४ किलो वजनी गटात अष्टविनायक तीर्थक्षेत्र महड गावातील दिनेश पवार या खेळाडूने सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे दिनेशवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




दिनेशने देशाचे नाव उज्ज्वल करून खालापूर तालुक्याच्या नावलौकिकात भर पाडल्याने त्याच्यावर सर्वत्र कौतुकाची थाप मिळत असून मायदेशात परतल्यानंतर गावात जोरदार स्वागत करण्यात आले.

## अमोल मुझुमदार होणार भारतीय महिला संघाचा मुख्य प्रशिक्षक?

**मुंबई : प्रतिनिधी**

दिग्गज क्रिकेटपटू अमोल मुझुमदार भारतीय महिला संघाचा मुख्य प्रशिक्षक होण्यासाठी सज्ज झाला आहे. क्रिकेट सल्लागार समितीने निवडलेल्या उमेदवारांची मुलाखत सोमवारी मुंबईत घेतली. मीडिया रिपोर्ट्सनुसार या मुलाखतीत मुझुमदारने सीएसी सदस्य अशोक मल्होत्रा, जतीन परांजपे आणि सुलक्षणा नाईक यांना त्यांच्या ९० मिनिटांच्या सादरीकरणाने प्रभावित केले आहे. मुझुमदारशिवाय डरहमचे प्रशिक्षक जॉन लुईस आणि तुषार आरोठे यांचीदेखील मुलाखत घेण्यात आली.

भारतीय महिला संघ या महिन्यात बांगलादेशचा दौरा करणार आहे. बीसीसीआयला त्याआधी टीम इंडियाच्या प्रशिक्षकाची नियुक्ती करायची आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये रमेश पोवार यांना मुख्य प्रशिक्षकपदावरून हटवण्यात आले होते. तेव्हापासून हे पद रिक्त आहे. मुझुमदार कधीही भारताकडून खेळू शकला नाही, पण देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याच्या १४ हजारांहून अधिक धावा आहेत.

# बीओबी कॅरम स्पर्धेत विकास, कोमल विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

बँक ऑफ बडोदाच्या मुंबई विभागीय कॅरम संघ निवड चाचणी स्पर्धेत विकास महाडिकने पुरुष एकेरीचे, तर कोमल कदमने महिला एकेरीचे विजेतेपद पटकाविले. आयडियल सहकार्याने ही स्पर्धा बेलार्ड पियर येथे ५१ स्पर्धकांच्या सहभागाने उत्साहात यशस्वी झाली.



अंतिम सामन्यात उत्तम प्रारंभ करणाऱ्या हेमंत शेलारला गतविजेत्या विकास महाडिकने ११-१० असे चकविले. परिणामी हेमंत शेलारला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. महिलांच्या अंतिम सामन्यात कोमल कदमने प्रत्येक बोर्डात शानदार खेळ करीत अर्चना विश्वकर्माला १२-० असे एकतर्फी पराभूत करून अजिंक्यपदाला गवसणी घातली. बँक ऑफ बडोदाचे जनरल मॅनेजर मनीष कौरा व डेप्युटी जनरल मॅनेजर अर्षद खान यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या-उपविजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या पुरुष एकेरी सामन्यात विकास महाडिकने अरविंद दपकेचा १३-४ असा, तर हेमंत शेलारने रणजीत रावचा ८-६ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. महिला एकेरीच्या उपांत्य सामन्यात कोमल कदमने इंदिरा राणेवर १६-० असा, तर अर्चना विश्वकर्माने गुणवती करकेरावर ७-१ असा विजय मिळवून अंतिम फेरीत धडक दिली होती.

पहिल्या चार क्रमांकाचे विजेते बँक ऑफ बडोदा मुंबई विभागीय पुरुष व महिला कॅरम संघाचे १५ जुलैदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय आंतर विभागीय बीओबी कॅरम स्पर्धेत प्रतिनिधित्व करणार आहेत. निवड झालेल्या मुंबईच्या खेळाडूंना विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण व ज्येष्ठ कॅरम पंच प्रणेश पवार कार्यरत आहेत.

## इंग्लंडला धक्का; पोप संघाबाहेर

**लंडन : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या ॲशेस मालिकेत आतापर्यंत इंग्लंडसाठी खूप वाईट आहे. मायदेशात खेळल्या जाणाऱ्या मालिकेत इंग्लंडच्या संघाने यापूर्वीच दोन कसोटी सामने गमावले आहे. आता संघाचा उपकर्णधार दुखापतीमुळे बाहेर पडला आहे.

ॲशेस मालिका इंग्लंड क्रिकेट संघासाठी आतापर्यंत काही खास राहिलेली नाही. यजमान इंग्लंड आतापर्यंत सुरुवातीच्या दोन कसोटी सामन्यात पराभूत झाल्यानंतर मालिकेत २-०ने पिछाडीवर आहे. मालिकेतील पुढचा सामना ६ जुलैपासून हेडिंग्ले येथे खेळवला जाणार आहे.

# झिम आफ्रो टी-१० लीग रंगणार

**हरारे : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेमध्ये विश्वचषक पात्रता फेरीनंतर २० जुलैपासून झिम आफ्रो टी-१० लीग खेळवली जाणार आहे. या स्पर्धेच्या पहिल्या सत्रात एकूण पाच संघ सहभागी होतील. स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानचे अनेक माजी दिग्गज सहभागी होणार आहेत. २००७ टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघातील चार खेळाडू या स्पर्धेत असतील.

वेगवान गोलंदाज एस श्रीशांत, युसूफ आणि इरफान पठाण आणि रॉबिन उथप्पा झिम आफ्रो टी-१० लीगमध्ये खेळणार आहेत. याशिवाय स्टुअर्ट बिन्नी आणि पार्थिव पटेल हेदेखील असणार आहेत. स्पर्धेतील सर्व सामने झिम्बाब्वेची राजधानी हरारे येथे होणार आहेत.

झिम आफ्रो टी-१० लीगमध्ये हरारे हरिकेन्स, जोहान्सबर्ग बफेलोज, डर्बन कलंदर, बुलावायो ब्रेव्हस आणि केपटाउन सॅम्प आर्मी असे संघ आहेत. प्रत्येक संघात किमान १६ खेळाडू असतील. त्यापैकी सहा झिम्बाब्वेचे असतील. या सहापैकी किमान एक खेळाडू 'इमर्जिंग प्लेयर्स' श्रेणीतील असेल, तर प्रत्येक संघ चार परदेशी क्रिकेटपटूंना साइन करू शकतो.






# वर्ल्डकपआधी पाकिस्तानचा माइंड गेम

**कराची : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत १५ ऑक्टोबरला भारत आणि पाकिस्तान यांच्यात महामुकाबला होणार आहे. या सामन्याआधी आतापासूनच पाकिस्तानने माइंड गेम खेळण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानचा माजी फिरकीपटू सईद अजमलने भारतीय गोलंदाजी पाकिस्तानी फलंदाजांना अजिबात आव्हान देऊ शकणार नाही, असे असे म्हटले आहे.

**माजी क्रिकेटपटूने टीम इंडियाला डिवचले**

एका पॉडकास्टमध्ये बोलताना अजमल म्हणाला की, भारताची गोलंदाजी पाकिस्तानइतकी धारदार कधीच नव्हती. भारतीय गोलंदाजी लाइनअप नेहमीच कमकुवत राहिली आहे. अलीकडच्या काळात फक्त मोहम्मद शमी आणि सिराजनेच चांगली गोलंदाजी केली आहे. फिरकीपटूंमध्ये मला वाटते की, विश्वचषकात रवींद्र जडेजा महत्त्वाचा खेळाडू भारतासाठी आहे. जसप्रीत बुमराह पाकिस्तानसाठी धोका ठरू शकतो, पण तो बऱ्याच काळापासून अनफिट आहे. अशा स्थितीत भारताची गोलंदाजी पाकिस्तानसाठी फारशी धोक्याची ठरेल असे मला वाटत नाही.

भारत-पाकिस्तान सामन्याचे भाकीत करताना अजमलने सांगितले की, त्यांच्या संघाच्या विजयाची शक्यता ६० टक्के आहे. पाकिस्तानकडे असलेले गोलंदाज पाहता जर आमच्या संघाने भारताला कमी धावसंख्येपर्यंत रोखले तर पाकिस्तान नक्की जिंकेल.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com